अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार, दि. १५ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३४६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## पती मनोरुग्ण असल्याचे लपवून विवाहितेची फसवणूक

### सासू-सासऱ्यासह दिरावर गुन्हा

**सोलापूर** : होणारा पती लग्नापूर्वी मनोरुग्ण असल्याची बाब लपवून विवाहितेला फसवून तिचा छळ केल्याप्रकरणी सासरच्या लोकांविरुद्ध सदर बाजार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी सुकेशनी रोहित बेळमकर (वय-२७,रा.शिक्षक हौसिंग सोसायटी,मौलाली चौक) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सासरे अभिमन्यू मदारी बेळमकर (वय-७०), सासू पार्वती अभिमन्यू बेळमकर (वय-६५) व दिर राजेश अभिमन्यू बेळमकर (वय-३५, सर्व रा.आदित्य नगर,साई होम विजापूर रोड सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांचे पती लग्नापूर्वीपासून मनोरुग्ण असल्याची बाब लपवून फिर्यादी सुकेशनी बेळमकर यांना चुकीची माहिती देऊन फसवणूक केली.तसेच फिर्यादी यांच्या आई वडिलांकडून साडेतीन तोळे सोने व संसार उपयोगी वस्तु घेऊन लग्नात दहा लाख रुपये खर्च करण्यास भाग पाडले. त्यानंतर फिर्यादी यांचा मानसिक व शारीरिक छळ करत फिर्यादींचे सोन्याचे दागिने व संसार उपयोगी साहित्य बेकायदेशीररित्या फिर्यादी यांची परवानगी नसताना स्वतःच्या ताब्यात ठेवून घेऊन परत दिले नाहीत. असे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मुल्ला हे करित आहे.

# एफआरपीच्या नियमाला चुना, धुराडे पेटू लागले पुन्हा

- १४ दिवसात बिल अदा करणे बंधनकारक
- विलंब झाल्यास व्याजासह एफआरपी देण्याची तरतूद; मात्र कोण दाखल करणार गुन्हा?

**सुराज्य/सोलापूर**

**चालू वर्षीचा गळीत हंगाम उंबरठ्यावर आला असून जिल्ह्यात बहुतांश साखर कारखाने धुराडे पेटविण्यासाठी सज्ज झाले असले तरी गेल्या हंगामातील ३१ ऑगस्टपर्यंत २०३ कोटी रुपये थकित असून एफआरपी दिल्याशिवाय गाळप परवाना न देण्याची मागणी ऊस उत्पादक शेतकऱ्यांतून होत आहे तर ऊसाचे वाढते क्षेत्र पाहता व गेल्यावर्षी ऊस गाळपास उशीर झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. याचा विचार करता १ ऑक्टोबरपासून गाळप हंगाम सुरू होणार असल्याचे सहकार मंत्र्यांनी सांगितले आहे.मात्र जिल्ह्यातील साखर कारखानदार थकित एफआरपी दिवाळी पूर्वी दिली जाईल, असे सांगत आहेत. मात्र यंदा दिवाळी २० ऑक्टोबर नंतर आहे.तत्पूर्वी तीन आठवडे आधीच गाळप हंगाम सुरू होत आहे. तर एफआरपी दिल्याशिवाय गाळप परवाना दिला जाणार नाही, असे साखर आयुक्तांचे धोरण आहे.त्यामुळे १ ऑक्टोबरला साखर कारखाना सुरू करायचा झाल्यास त्या अगोदर थकित एफआरपी द्यावी लागणार आहे.**



गतवर्षीच्या गाळप हंगामात जिल्ह्यातील ३४ साखर कारखान्यांनी ऊस गाळप केला. आता यंदाचा हंगाम तोंडावर असतानाही त्यापैकी १८ कारखान्यांनी अद्यापही शेतकऱ्यांची पूर्णपणे एफआरपी दिलेली नाही. या कारखान्यांनी शेतकऱ्यांची सुमारे २०३ कोटी रुपयांची एफआरपी थकविली आहे. जिल्ह्यात जवळपास ३६ साखर कारखाने आहेत. गतवर्षी त्यापैकी ३४ साखर कारखान्यांनी प्रत्यक्ष गाळप केले. हा गाळप हंगाम पूर्ण होऊन आता तीन महिने झाले आहेत. तरीही शेतकऱ्यांना पूर्णपणे पैसे मिळालेले नाहीत. कायद्यानुसार गाळपानंतर १४ दिवसांच्या आत पूर्णपणे एफआरपी देणे कारखान्यांना बंधनकारक आहे. पण कारखान्यांनी हा कायदा पायदळी तुडवला आहे. अनेक कारखान्यांनी तरी दिलेले पैसेही तुकड्या-तुकड्यांनी दिले आहेत. तसेच विलंबाने मिळणारी एफआरपी कारखान्यांनी व्याजासह द्यावी, अशी तरतूद कायद्यात आहे. पण त्याचेही पालन होत नाही. प्रशासनही यावर गप्पच आहे. पण शेतकरी मात्र कारखान्यांकडे हेलपाटे मारत आहेत.

### अर्धवट एफआरपी दिलेले कारखाने

गतवर्षीच्या एफआरपीची रक्कम अर्धवट दिलेल्या कारखान्यात ३१ ऑगस्टच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील पांडुरंग (माळशिरस), श्री सिद्धेश्वर (सोलापूर), संत दामाजी (मंगळवेढा), श्री विठ्ठलराव शिंदे (माढा), मकाई (करमाळा), संत कुर्मदास (माढा), दी सासवड माळी शुगर (माळशिरस), विठ्ठल कॉर्पोरेशन (माढा), इंद्रेश्वर शुगर (बार्शी), युटोपियन शुगर (मंगळवेढा), सहकार शिरोमणी (पंढरपूर), मातोश्री शुगर (अक्कलकोट), भीमा शुगर (मोहोळ), धाराशिव युनिट चार (सांगोला) आणि शंकर साखर कारखाना (माळशिरस) या प्रमुख कारखान्यांसह १८ कारखान्यांचा समावेश आहे.



## सराईत गुन्हेगार विपुल शिंदे एमपीडीए अंतर्गत स्थानबध्द

**सोलापूर** : सोलापूर शहरातील फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील सराईत गुन्हेगार विपुल रामदास शिंदे (वय-३३,रा. चौपाड,दक्षिण कसबा, सोलापूर) यास एमपीडीए अधिनियम, १९८१ अन्वये १३ सप्टेंबर २०२२ रोजी स्थानबद्ध केले आहे.

विपुल रामदास शिंदे हा मागील अनेक वर्षोपासून आर्थिक फायदा मिळवण्यासाठी घातक शस्त्रानिशी फिरून जबरी चोरी, घरफोडी, गैर कायद्याची मंडळी जमविणे, खून करणे, खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत, गंभीर दुखापत करणे, खंडणी मागणे, धमकी देणे, मारामारी करणे, विनयभंग करणे, शस्त्रानिशी फिरून हल्ला करणे यासारखे गंभीर गुन्हे करत दहशत व भिती घालून नागरिकांविरुद्ध गुन्हेगारी वर्तन केले आहे. त्याच्यावर शहरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यास एकूण ०७ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याच्या नोंदी आहे.त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी सन २०२१ मध्ये महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार कारवाई करण्यात आली होती.



विपुल शिंदे याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही, पुन्हा त्याने पोलीस उप-आयुक्त परिमंडळ, सोलापूर शहर यांचेकडील आदेशानुसार सोलापूर शहर, उर्वरित सोलापूर जिल्हा, पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका, उस्मानाबाद जिल्ह्याह्यातून तडीपार आदेशाचा भंग करून सोलापूर शहर हद्दीत प्रवेश करून गंभीर स्वरूपाचा गुन्हा केला आहे.विपुल रामदास शिंदे याचे विरुद्ध वेळोवेळी कारवाई करूनही त्याच्या गुन्हेगारी वर्तनामध्ये कोणतीच सुधारणा झाली नाही. त्याच्या गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध करण्यासाठी पोलीस आयुक्त यांनी त्यास एमपीडीए अधिनियम, १९८१ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित केले आहेत. त्यास आदेशाची बजावणी करून येरवडा कारागृह,पुणे येथे दाखल करण्यासाठी रवानगी करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त, डॉ.राजेंद्र माने सोलापूर शहर यांनी कार्यभार स्वीकारल्यापासून एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची चौथी व या वर्षातील आठवी कारवाई आहे.

## आता मोर्चे नको, थेट आरक्षणसाठी सोलापुरात परिषद

**सोलापूर** : गेल्या अनेक दिवसापासून गाजत असलेला मराठा आरक्षणाचा मुद्दा निकाली काढण्यासाठी सोलापुरातून सकल मराठा समाज व मराठा क्रांती मोर्चाच्या माध्यमातून येत्या१८ तारखेला मराठा समाजाला ५० टक्क्यातून आरक्षण देण्यासाठी घटनात्मक परिषद घेऊन राज्यातला पहिला एल्गार पुकारला जाणार असल्याची माहिती मराठा समाज परिषदेचे संयोजक रवी मोहिते यांनी दिली.

रविवारी१८ सप्टेंबर रोजी सकाळी दहा ते चार या कालावधीमध्ये सदरची परिषद छत्रपती शिवाजी प्रशालेत आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला राज्यभरातून प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. आजपर्यंत मराठा समाजाने ५८ मोर्चे काढून आरक्षणाबाबत सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला, मात्र कोर्टात टिकेल असे आरक्षण सरकारने दिले नाही आता कोणाचे आरक्षण कट करून द्यायचं की थेट द्यायचं हा प्रश्न सरकारवर सोपवून आपण फक्त आरक्षण घ्यायचं असा सूर या बैठकीतून काढण्यात आला.



शासकीय विश्राम गृह येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत मोहिते हे बोलत होते. यावेळी प्रताप कांचन ॲड. सुरेश गायकवाड राम गायकवाड राजन जाधव आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. या बैठकीस, राम गायकवाड, ॲड सुरेश गायकवाड, ॲड श्रीरंग लाळे, विजय मोहिते, भाऊसाहेब रोडगे, श्रीकांत डांगे, विजय पोकरकर, विकास कदम, सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, सुहास कदम, योगेश पवार, शेखर फंड, सदाशिव पवार, बजरंग जाधव, महेश सावंत, किरण पवार, निर्मला शेळवणे, मनीषा नलावडे, उषा गायकवाड, राम साठे, सुरेश ननवरे, सचिन चव्हाण, मिलिंद भोसले, किशोर चव्हाण, अंबादास सपकाळे, अविनाश गोडसे, दिनेश जाधव, बाळासाहेब उबाळे, शिवदास वाडकर, विजय चव्हाण, अनिल मस्के, आधी समाज बांधव उपस्थित होते. बैठकीचे आयोजन सकल मराठा समाज व क्रांती मोर्चा च्या वतीने करण्यात आले होते. उपस्थित समाज बांधवांचे आभार विजय मोहिते यांनी मानले.

## खुनी हल्ला प्रकरणी आरोपीस ७ वर्षे सक्तमजुरी

**सोलापूर** : आई वरून घाण-घाण शिवीगाळ करत असताना फिर्यादी उस्मान हसनसाब शेख यांनी आरोपीस शिवीगाळ कोणाला व का करत आहे असे विचारले.त्या कारणावरून चिडून जाऊन खुनी हल्ला केल्याप्रकरणी आरोपी अब्दुल जब्बार अब्दुल गफूर शेख यास जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन पांढरे यांनी ७ वर्षाची सक्त मजुरी ची शिक्षा ठोठावली. दि.१ सप्टेंबर १७ रोजी साडेनऊ वाजण्या सुमारास गौस शेख यांच्या कॅन्टीनवर फिर्यादी व त्याचा लहान भाऊ बोलत उभे असताना आरोपी अब्दुल जब्बार अब्दुल गफार शेख (रा.विडी घरकुल,कुंभारी) हा आई वरून घाण घाण शिवीगाळ करत होता.त्याचा जाब विचारलेल्या कारणावरून चिडून जाऊन त्यांनी त्यांच्या हातात असलेल्या चाकूने फिर्यादी व त्याचा लहान भाऊ शाहनवाज या दोघांवर जीवे मारण्याच्या दृष्टीने चाकूने डोक्यात,तोंडावर सपासप वार केले.

या प्रकरणात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले.यात सरकार पक्षातर्फे १० साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीस खुनी हल्ला,शिवीगाळ व दमदाटी या अपराधाखाली दोषी धरून ७ वर्षाची सक्त मजुरी, २ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली. सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील ॲड.ए.जी कुलकर्णी. ॲड.डी.एम पवार, ॲड. शीतल डोके, ॲड.जी.आय रामपुरे यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड.ए.एम शेख यांनी काम पाहिले. या प्रकरणाचा तपास सा.ह.पो.नि.एम.एस. भावीकट्टी यांनी केला. कोर्ट पैरवी म्हणून साळवे यांनी काम पाहिले.

## गांगुली-शाह जोडी २०२५ कायम राहणार

**मुंबई** : भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे अध्यक्ष सौरव गांगुली आणि सचिव जय शाह यांचा कार्यकाळ वाढणार आहे. सुप्रीम कोर्टाने बीसीसीआयच्या घटनेत दुरुस्ती करण्यासाठी मंजुरी दिली आहे. याचा थेट फायदा सौरव गांगुली आणि जय शाह यांना मिळाला आहे.

## शिट्टी वाजवून महिलेची छेडछाड; आरोपीस शिक्षा

**सोलापूर**:सोलापूरातील जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.पांढरे यांनी आरोपी कुंदन बाळू सुरवसे (वय-३३, रा.खेड, ता.उ.सोलापूर) यांस महिलेची छेडछाड केल्याप्रकरणी अपिलात कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

आरोपींने १५ हजार रुपये फिर्यादी हिला देण्याचा आदेश पारीत केलेला आहे. या प्रकरणात सविस्तर हकिकत अशी की, दि.५ मार्च २०१३ रोजी पिडीत महिला व तिची बहिण शिवण क्लासला जात असताना आरोपी हा खेड पाटीजवळ उभा होता व त्याने पिडीतेला पाहून शिट्ट वाजवली व तु माझ्या बरोबर येतीस काय असे शब्द बोलल्यानंतर फिर्यादीने घरी येवून वडील व भावाला घटना सांगितली.या हकिकतीवरुन सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद झाला होता. खटल्याची सुनावणी होवून प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सोलापूर यांनी आरोपीस दोषी धरुन शिक्षा सुनावली होती. त्या शिक्षेविरुध्द आरोपीने अपील दाखल केले होते.त्या अपीलाकामी आरोपीस कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली व आरोपीने १५ हजार रुपये फिर्यादी हिला देण्याचा आदेश न्यायालयाने पारीत केलेला आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



एखादा रस्ता सुस्थितीत राहिलाय का? ते शोधतोय....

कल्याण
667-99-135

मेन बाजार
689-37-223

# लम्पी 'साथ'; झूठ बात..!

- सोशल मिडीयावर चुकीच्या अफवांचे अमाप पीक
- अफवांना घाबरून लोकांनी लोकांनी दूध खाणे अन् पिणेही केले बंद
- पशुपालकांमध्ये प्रचंड 'धास्ती' चा व्हायरस
- लम्पी त्वचा व्हायरसचे जनावर विष घालून मारण्याचे थेट सल्ले

**सुराज्य/सोलापूर**

लम्पी त्वचा रोगाचा व्हायरस जनावरांमध्ये आला असून, हा व्हायरस जनावरांसह माणसांच्या जिवावर उठणार असल्याच्या अफवांचे अमाप पीक सोशल मिडियावर उठले असून चुकीच्या अफवांमुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये 'धास्ती' चा व्हायरस झपाट्याने पसरत आहे. ग्रामीण भागातील जनजीवनाची अस्वस्थता यातून वाढत चालली आहे.



विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील केवळ माळशिरस आणि मंगळवेढा तालुक्यात काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत जनावरांमध्ये या आजाराची लक्षणे दिसून आली आहेत. तिथे उपाय योजना सुरू केलेल्या असल्या तरी, संपूर्ण जिल्ह्यात या आजाराच्या चर्चांना अक्षरशः ऊत आला आहे. यामुळे जिल्ह्यातील पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सोशल मीडियावरून उठविण्यात आलेल्या चुकीच्या अफवांमुळे काही नागरिकांनी दुधाच्याबाबतीत तटस्थ भूमिका घेणे सुरू केले आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थ खाणे बंद केले. उल्लेखनीय बाब म्हणजे, कोरोना विषाणूजन्य साथीचा संदर्भ जनावरांमधील लम्पी त्वचा व्हायरस आजाराशी चुकीच्या पद्धतीने जोडला जात आहे. जनावरांमधील हा व्हायरस माणसांमध्ये संक्रमित होऊन संबंधित जनावरांच्या संपर्कातील व्यक्तीला मरण येते, अशी अत्यंत चुकीची अफवा पसरवली जात आहे. नागरिक अधिकाधिक धास्तावले जावेत, यासाठी खोडासाळपणा करून सोशल मिडियावर जनावरांप्रमाणे खुद्द माणसांच्या अंगावरही पुरळ उठल्याची भडक तसेच लक्ष विचलित करणारी छायाचित्रे पोस्ट केली जात आहेत. त्यातून पशुपालक धास्तावून गेले आहेत.



(या संबंधीत वृत्त पान ३ वर)

### लम्पी व्हायरसची लक्षणे

✻ दुभती गाय, किंवा म्हैस असेल तर दूध देणे बंद करते ✻ जनावरांच्या अंगात तीव्र सणसणून ताप भरतो ✻ जनावर चारा किंवा पशू खाद्याला तोंड लावत नाही (भूक मरते) पाणी पित नाही ✻ जनावरांच्या नाकातून आणि डोळ्यातून पाणी येते ✻ डोळे, मान, कास यासह अन्य ठिकाणी १० ते ५० व्यासाच्या गाठी येतात ✻ तोंड खराब होते ✻ जनावरांचे डोळे चिडतात ✻ जनावराला उठता येत नाही, जनावर लगडे होते.

### लम्पी व्हायरसवर 'हे' करा उपचार...

✻ गायी किंवा म्हैस यांना मच्छर व गोमाशी यांच्यापासून होणाऱ्या त्रासापासून मुक्तता मिळावी यासाठी निमतेल व लाईफबॉय साबण एकत्र करून फवारणी करावी ✻ कडू लिंबाच्या झाबाच्या हिरव्या पाल्यापासून धूर करून मच्छर किंवा गोमाशी पळवण्याचा प्रयत्न करावा ✻ शक्यतो गोठ्यात किंवा घाण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, गोठा आणि जनावरे बांधण्याची जागा स्वच्छ ठेवावी ✻ लम्पी व्हारसयची लक्षणे जनावरांत दिसल्यास तत्काळ पशू वैद्यकीय यांच्याशी संपर्क साधून उपचार करून घ्यावेत.

### खोडसाळपणे पोस्ट व्हायरल

लम्पी त्वचा व्हायरस मोठ्या प्रमाणात संक्रमित झालेला नसताना देखील, हा आजार अधिक पसरल्याच्या अफवा पसरवून नागरिकांमध्ये धास्ती तसेच काळजीचे वातावरण निर्माण केले जात आहे. काही नतदृष्ट लोकांकडून सोशल मिडीयाद्वारे खोडसाळपणा केला जात आहे, यातून ग्रामीण भागातील जनजीवन अस्वस्थ होत आहे, या प्रकरणात दोषी असलेल्या संबंधितांवर गुन्हे दाखल करून त्यांच्या नांग्या ठेचायला हव्यात,अशी मागणी जाणकार नागरिकांमधून होत आहे.

## संघर्षाची खरी मेख

भारतासारख्या महाकाय लोकसंख्येच्या देशात केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यात सुसंवाद असला पाहिजे. उभयतांमध्ये योजनांची देवाणघेवाण असायला हवी. केंद्राकडून ज्या निधींचे वाटत केले जाते,त्यात समानता असायला हवी. दोनही सरकारांमध्ये वैर असता कामा नये,असे संकेत आहेत पण अलिकडच्या राजकारणात ते पाळले जात नाहीत. त्यातून केंद्र आणि राज्य सरकार यांच्यात सतत वादाची ठिगणी पडत असते. आठ वर्षांपासून केंद्रात भाजपची सत्ता आहे तर काही राज्यांमध्ये भाजपेतर पक्षांचे सत्तेवर वर्चस्व आहे. ज्या राज्यात भाजपची सत्ता आहे, तिथे केंद्र आणि राज्य यांच्यात सूत जुळते. तिथे वाद नाही.पण भाजपेतर पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये आणि केंद्र सरकार यांच्यात सतत धुसपूस सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे राजकारण. ममता बॅनर्जी, के.चंद्रशेखर राव, एम.स्टॅलिन यांच्यात आणि केंद्र सरकार यांच्यात सुप्त संघर्ष समोर येत असतो तर दिल्ली आणि बिहार आणि मोदी सरकार यांच्यात तर उघडपणे लढाई सुरू झाली आहे.लोकसभेच्या निवडणुका जवळ येऊ लागताच हा संघर्ष अधिक तीव्र होत जाणार,यात शंकाच नाही. देशाची राजधानी दिल्लीत मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वातील आप सरकार आणि उपराज्यपालांचा संघर्ष नवा नाही. आप दिल्लीत सत्तेत आल्यापासून या ना त्या कारणाने केजरीवाल सरकार आणि उपराज्यपालांचा संघर्ष सातत्याने पाहायला मिळत आहे. आताही पुन्हा दिल्ली सरकार आणि उपराज्यपालांमध्ये संघर्ष होत आहे.दिल्ली परिवहन महामंडळाने खरेदी केलेल्या एक हजार बसेसच्या खरेदीवरून नवा वाद पेटला आहे. दिल्लीचे उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी रविवारी (११ सप्टेंबर) महामंडळाच्या या बस खरेदीची चौकशी करण्याबाबतची तक्रार सीबीआयकडे पाठवण्यास मंजुरी दिली. सक्सेना यांनी त्यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून जनतेचे लक्ष्य हटवण्यासाठी अशाप्रकारचे खोटे आरोप करत आहेत,अशी दिल्लीच्या सत्तेत असणाऱ्या आम आदमी पार्टी अर्थात आपची तक्रार आहे. दुसरीकडे दिल्लीत विरोधी बाकावर असणाऱ्या



भाजपाने या मुद्द्यावर थेट मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला चढवला. केजरीवाल आणि भ्रष्टाचार हे समानार्थी शब्द झाले आहेत, असे भाजप म्हणते. उपराज्यपालांनी ज्या तक्रारीच्या आधारे डीटीसी बस खरेदीच्या सीबीआय चौकशीबाबत तक्रार करण्यास मंजुरी दिली ही मूळ तक्रार जूनमध्ये दाखल झाली होती. या तक्रारीत डीटीसी बस खरेदी समितीच्या अध्यक्षपदी दिल्ली वाहतूक मंत्र्यांच्या निवडीत अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे तसेच दिल्ली इंटिग्रेटेड मल्टी मॉडेल ट्रान्झिट सिस्टमच्या नेमणुकीवरही आक्षेप घेण्यात आला आहे. ही नेमणूक बस खरेदीत अनियमितता करण्यासाठी केल्याचा आरोप केला गेलाय. ही तक्रार जुलै २०१९ मध्ये एक हजार बस खरेदी आणि मार्च २०20 मधील वार्षिक देखभाल दुरुस्तीच्या ठेक्याविषयी असल्याचे सांगण्यात येते. या दोन्ही व्यवहारांमध्ये अनियमिततेचा आरोप करण्यात आला आहे. ही तक्रार २२ जुलैला मुख्य सचिवांकडे आली. त्यानंतर १९ ऑगस्टला काही अनियमितता आढळल्याचे सांगत ही तक्रार उपराज्यपालांकडे पाठवण्यात आली. मुख्य सचिवांनी या व्यवहारात केंद्रीय दक्षता विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे आणि सामान्य आर्थिक नियमांचे पालन झाले नसल्याचे म्हटले तसेच डीआयएमटीएसची नेमणूक जाणीवपूर्वक झाल्याचाही आरोप करण्यात आला. आपचे या संपूर्ण प्रकरणात अद्याप एकही बस खरेदी झालेली नाही किंवा कुणालाही एक रुपयांचेही पेमेंट झालेले नाही. मग भ्रष्टाचार नेमका कुठे झाला आहे? हा आपचा दावा आहे. या प्रकरणात काही तक्रारी आल्यानंतर केजरीवाल सरकारने ही संपूर्ण प्रक्रिया स्थगिती केली आहे. तसेच चौकशी सुरू केली आहे. या चौकशीचा अहवाल आल्यानंतरच यावर पुढील निर्णय होईल. मागील २ वर्षांपासून या खरेदीवर स्थगिती आहे आणि आप सरकारला एकही बस खरेदी करता आली नाही. आम आदमी व भाजप नेत्यांमध्ये यावरून जे आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत,त्यामागे आर्थिक कारणे असावीत.आपचा व्यवहार स्वच्छ होता तर खरेदीला स्थगिती का दिली. चौकशी का लावली? अशा समित्या सरकारच्या ताटाखालचे मांजर असतात.त्यामुळे त्यातून काय निष्पन्न होते हे जनतेचा ठाऊक असते.केंद्रातील असो वा राज्यांमधील सरकार हे लोकनियुक्त असते. तेव्हा दोघांनीही लोकशाहीची आब राखून सत्ता चालवली पाहिजे. हा सत्तेचा सिध्दांत आहे.पण आमच्या राजकिय पक्षांनी तो पुसून टाकला आहे. दिल्लीचा इलाखा केंद्रीय सत्तेच्या ताब्यात असतो. उपराज्यपालांच्या खांद्यावर बंदूक ठेऊन भाजप सरकार आपला धडा शिकवत आहे.दिल्लीनंतर केजरीवाल यांनी पंजाबची एकहाती सत्ता घेतली.आता त्यांचे टार्गेट गुजरात आहे.त्यामुळे मोदी- शहा ही जोडी केजरींना पाण्यात पाहात आहे.वादाची खरी मेख ही आहे.

---

**राजकीय**

## काँग्रेसची संघ द्वेष यात्रा...

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेला ७ सप्टेंबर रोजी सुरुवात झाली. कन्याकुमारीपासून सुरू झालेल्या भारत जोडो यात्रेचा मार्ग बारा राज्यांतून काश्मीरपर्यंत जाणार असून ३५०० किमी अंतर पार करणार आहे. २०२४ ची लोकसभा निवडणूक हेच ध्येय त्यांच्यापुढे आहे. भाजपवर टीका आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी द्वेष एवढाच अजेंडा राहुल यांचा दिसतो आहे. प्रत्येक निवडणुकीत भाजपचे संख्याबळ आणि मतांची टक्केवारी वाढत आहे. आपले काय चुकते, काँग्रेस पक्ष कुठे कमी पडतो, याचे आत्मपरीक्षण करण्याऐवजी ते भाजप व संघ परिवारावर हल्लाबोल करीत आहेत. लोकांचा आवाज दाबला जात आहे. देशातील प्रत्येक संस्थांवर भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने कब्जा केला आहे. काही मूठभर उद्योगपती देशावर नियंत्रण करीत आहेत, असे तेच तेच आरोप राहुल गांधी या यात्रेच्या निमित्ताने रोज करीत आहेत. राहुल यांचे हे आरोप सामान्यांना पटत नाहीत.

भारत जोडो यात्रा केरळ, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश, दिल्ली, हरियाणा, पंजाब या राज्यांतून काश्मीरपर्यंत जाणार आहे. ३५७० किमी यात्रेच्या मार्गावर ३७२ लोकसभा मतदारसंघांमधून राहुल गांधींचा प्रवास होणार आहे. बारा राज्यांतील सर्व मतदारसंघांतून राहुल यांची यात्रा जाणार नाही. नांदेडला यात्रा आली म्हणजे सर्व महाराष्ट्रात काँग्रेसला लाभ होईल असे मुळीच नाही. भारत जोडो यात्रा काँग्रेसला जनाधार वाढविण्यासाठी आहे की, जनतेची मने भडकविण्यासाठी आहे? भाजपने तर राहुल यांची ही यात्रा आहे की भारत तोडोसाठी आहे का? असा स्पष्ट सवालच विचारला आहे. भारत जोडो यात्रा दुसऱ्या दिवसापासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गणवेश असलेल्या जळत्या खाकी हाफ पॅण्टचे छायाचित्र काँग्रेसने ट्वीट करून भाजप व संघाला डिवचण्याचे काम केले. संघाची हाफ पॅण्ट जळत असताना त्याखाली आणखी १४५ दिवस शिल्लक, असे लिहिले आहे. देशाला द्वेषाच्या बेड्यातून मुक्त करणे व भाजप-संघाकडून झालेल्या हानीची भरपाई करणे हे आमचे लक्ष्य असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. असे वादग्रस्त ट्वीट करून काँग्रेसने आ बैल मुझे मार अशी स्वत:ची अवस्था करून घेतली. संपूर्ण भारतात केरोसिन शिंपडले गेले आहे आणि केवळ एका आगपेटीच्या



काडीने भारतात आग लागेल, असे वक्तव्य राहुल यांनी गेल्या वर्षी केंब्रिज विद्यापीठात केले होते. राजस्थानच्या चिंतन शिबिरातही देशात आग लागेल असे ते म्हणाले होते.

भारत जोडो यात्रेतून राहुल यांना काय साधायचे आहे? ज्या केरळमध्ये संघाच्या कार्यकर्त्यांच्या सतत हत्या होत आहेत तेथे राहुल यांची यात्रा अठरा दिवस आहे आणि जिथे योगी आदित्य नाथ यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार आहे त्या सर्वात मोठ्या उत्तर प्रदेशात यांची राहुल यात्रा केवळ दोन दिवसांत आटोपली जाणार आहे. मुंबईवर २६-११ला जेव्हा दहशतवादी हल्ला झाला तेव्हा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने हे तर संघाचे कारस्थान असे उद्गार काढले होते. तोच नेता आज राहुल यांच्या चौकडीतला म्हणून ओळखला जातो. संघाला टार्गेट करून काँग्रेसची मते वाढणार आहेत का? जनसमर्थन प्राप्त करण्यासाठी भारतीय राजकारणात राहुल गांधींची निघालेली भारत जोडो यात्रा ही काही पहिलीच यात्रा नव्हे. १९३० मध्ये महात्मा गांधींनी दांडी मार्च काढून सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले होते. १९९० मध्ये लालकृष्ण अडवाणी यांनी रामरथ यात्रा काढून भाजपला संजिवनी दिली आणि पक्षाला केंद्रात सत्तेच्या दिशेने नेले. १९८४ मध्ये भाजपचे केवळ दोन खासदार निवडून आले होते, त्यांची संख्या अडवाणी यांच्या रथयात्रेनंतर ८५ वर गेली व नंतर १२० वर पोहोचली. आता तर मोदींच्या कारकिर्दीत भाजपचे तीनशेपेक्षा जास्त खासदार लोकसभेत आहेत.

महात्मा गांधी यांनी काढलेला दांडी मार्च १२ मार्च १९३० रोजी सुरू झाला. साबरमती आश्रम, अहमदाबाद ते दांडी असा ३८५ किमी अंतराची ती यात्रा होती. ब्रिटिशांच्या काळात मिठावर कर लावला म्हणून त्या विरोधात गांधीजींनी मार्च काढला होता. १९८२ मध्ये आंध्र प्रदेशमध्ये एनटी रामाराव यांनी चैतन्य रथम यात्रा काढली. हैदराबादहून २९ मार्च १९८२ रोजी सुरू झालेली यात्रा ७५ हजार किमी अंतराची होती. अविभाजित आंध्र प्रदेशमध्ये १९७२ ते १९८२ या काळात राज्यात पाच वेळा मुख्यमंत्री बदलले गेले. एकदा राष्ट्रपती राजवट लागली. जनतेला मजबूत व स्थिर सरकार मिळावे म्हणून रामाराव यांनी चैतन्य रथ यात्रा काढली होती. या यात्रेने रामाराव यांच्या पक्षाला प्रचंड जनसमर्थन मिळाले. १९८३ मध्ये झालेल्या निवडणुकीत रामाराव यांच्या तेलुगू देशमचे २९४ पैकी १९९ जागांवर आमदार निवडून आले. त्यानंतर राज्यात तेलुगू देशमचे पाच वेळा सरकार स्थापन झाले. माजी पंतप्रधान चंद्रशेखर यांनी १९८३ मध्ये कन्याकुमारी ते दिल्ली अशी ४ हजार किमी अंतराची पदयात्रा काढली होती. तेव्हा काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्ष दुर्बल व विसकटलेला होता. पण त्यांनी कोणाला टार्गेट करून यात्रा काढली नव्हती.

अयोध्येत राम मंदिराच्या उभारणीचा मुद्दा मांडून भाजपने लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली राम रथयात्रा सुरू केली. गुजरातमधील सोमनाथ मंदिर ते अयोध्या अशी रथ यात्रा २५ सप्टेंबर १९९० रोजी सुरू झाली. ९ राज्यातून १० हजार किमी मार्गक्रमण करीत निघालेली यात्रा बिहारमधील लालूप्रसाद सरकारने समस्तीपूरमध्ये अडवली व अडवाणी यांना अटक केली. त्यानंतर लगेचच केंद्रातील व्ही. पी. सिंग सरकारचा भाजपने पाठिंबा काढून घेतला व सिंग सरकार कोसळले. कारसेवक जेव्हा अयोध्येला पोहोचले तेव्हा यूपीतील मुलायम सरकारने त्यांच्यावर गोळीबार केला. मात्र त्या घटनेनंतर देशात भाजपची शक्ती वेगाने वाढली. सन २००४ मध्ये आंध्र प्रदेशमध्ये वाय. एस. राजशेखर रेड्डी यांनी चेतल्ला शहरापासून यात्रा काढली. १५०० किमीची यात्रा अकरा जिल्ह्यांतून फिरली. राज्यात दुष्काळाची परिस्थिती होती म्हणून सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राजशेखर रेड्डींनी पदयात्रा काढली होती. दहा वर्षे सत्तेवर असलेल्या तेलुगू देशम सरकारच्या विरोधात नाराजी मोठी होती, रेड्डी यांना यात्रेतून मोठे जनसमर्थन मिळाले. २००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत २९४ पैकी १८५ जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले व तेलुगू देशमला हटविण्यात रेड्डी यांची पदयात्रा कारणीभूत ठरली. आंध्र प्रदेशमध्ये जगनमोहन रेड्डी यांनी २०१७ मध्ये प्रजा संकल्प यात्रा काढली होती. ६ नोव्हेंबरला कडप्पा जिल्ह्यातून निघालेली श्रीकाकुलमपर्यंत पोहोचली. ४३० दिवसांत १३ जिल्ह्यांतील १२५ विधानसभा मतदारसंघांतून ३६४८ किमी अंतर रेड्डी यांनी पदयात्रेतून पार केले. २००९ मध्ये त्यांचे पिताजी वाईएस राजशेखर रेड्डी यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाल्यानंतर काँग्रेस हायकमांडने जनगमोहन यांना मुख्यमंत्रीपदी बसविण्यास नकार दिला. त्यानंतर त्यांनी वाईएसआर काँग्रेसची स्थापना केली. यात्रेनंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत १७५ पैकी १५२ जागा जिंकल्या व राज्यात जगनमोहन यांचे सरकार स्थापन झाले. भारत जोडो यात्रेत राहुल यांच्या फाइव्ह स्टार राहणीमानाची व अंगावरील एकेचाळीस हजार रुपये किमतीच्या टी-शर्टची चर्चा अधिक झाली.

**– डॉ. सुकृत खांडेकर**

---

**टुडेज ब्लॉग**

## संख्याशास्त्राचे प्रसारक : डॉ. वसंत शंकर हुजुरबाजार

डॉ. वसंत शंकर हुजुरबाजार यांचा जन्म १५ सप्टेंबर १९१९ रोजी शंकर आबाजी आणि गंगाबाई हुजुरबाजार यांच्या पोटी कोल्हापूर येथे झाला. सहा भावंडापैकी ते चौथे होत. त्यांची मोठी बहीण कृष्णा या सामान्य सापेक्षता आणि गुरुत्व यावरील संशोधक सुप्रसिद्ध भौतिकी विष्णू वासुदेव नारळीकर यांच्या पत्नी तर लहान बंधू प्रसिद्ध गणितज्ञ. त्यांचे शालेय आणि पदवीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरात झाले. शालेय विद्यार्थी असल्यापासून डॉ. हुजुरबाजार यांना संभाव्यता सिद्धांतामध्ये विशेष स्वारस्य होते. शालेय जीवनात त्यांच्या वर्गात नेहमी ते सर्व विषयात प्रथम असायचे. तथापि, त्यांना गणित आणि संस्कृत विषयांमध्ये विशेष अभिरुची होती. पदवीसाठी राजाराम महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर तेथे नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या एका गणिताच्या अभ्यासक्रमात संभाव्यतेचे घटक आणि सांख्यिकी यांचा समावेश करण्यात आला होता. यासाठी राजाराम महाविद्यालयातील दोन गणिताच्या प्राध्यापकांनी इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट (आय.एस.आय.) कोलकाता येथून सांख्यिकी मधील प्रशिक्षण घेऊन आले होते. तथापि हा नवीन सांख्यिकी चा अभ्यासक्रम पदवीपर्यंत नसल्याने त्यांना तो पुढे इच्छा असूनही पूर्ण करता आला नाही. त्यानंतर गणितातील पदव्युत्तर शिक्षणासाठी (१९४० ते १९४२) ते बनारस हिंदू विद्यापीठांमध्ये दाखल झाले.




बनारस मध्ये गणिताचे पदव्युत्तर शिक्षण घेत असताना तेथे भारतीय विज्ञान वार्षिक परिषद (जानेवारी १९४१) संपन्न झाली. या वार्षिक परिषदेमध्ये प्रोफेसर पी.सी. महालानोबिस यांच्या प्रयत्नाने तेथे सांख्यिकीचा नवीन विभाग स्थापन केला गेला आणि परिषदेमध्येच त्या विभागाचे औपचारिक उद्घाटन सर मोरेस हॉलेट यांनी केले. जो हुजुरबाजार यांना खूप भावला आणि त्यांच्या भाषणाने ते प्रभावित झाले. याच वेळी दिल्लीच्या भारतीय कृषी संशोधन संस्थेमधील शेतकी संख्याशास्त्रज्ञ डॉ. पी. व्ही. सुखात्मे आणि त्यांची झालेली भेट आणि नोबेल विजेते सर सी. व्ही. रामन. यांचे संभाव्यता'वरील दर्शकांना मंत्रमुग्ध करणारे तासाभरा चे विविध किस्से युक्त व्याख्यान, यामुळे ते संख्याशास्त्राकडे आकर्षित झाले. बनारस विद्यापीठातून गणिताची मास्टर पदवी घेतल्यानंतर भारतामध्ये संख्याशास्त्रातील संशोधनाच्या कोलकाता पुरत्याच मर्यादित असणाऱ्या संधी आणि दुसऱ्या महायुद्धाचा काळ असल्याने परदेशात जाणे अशक्य असल्याने १९४२ ते १९४६ पर्यंत ते कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात अध्यापक म्हणून कार्यरत राहिले. याच दरम्यान, भारतात संख्याशास्त्र हा विषय प्राधान्याने पुढे आला आणि अनेक विद्यापीठांनी संख्याशास्त्राचे अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन केले आणि म्हणूनच डॉ. हुजुरबाजार यांनी सुद्धा मग संख्याशास्त्रा मध्ये संशोधन करण्याचे ठरविले आणि दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर ते इंग्लंड मधील केंब्रिज विद्यापीठात संख्याशास्त्रात संशोधन करण्यासाठी दाखल झाले.सुदैवाने त्यांना डॉ. हेरॉल्ड जेफ्री जे व्यस्त संभाव्यता आणि अनुषंगिक अनुमान (इनवर्स प्रोबाबीलीटी एण्ड इनफरन्स बेस्ड ऑन इट ) यामध्ये स्वारस्य असलेले सुप्रसिद्ध विद्वान होते. अनुमानाच्या या शाखेचे मूळ जरी १८ व्या शतकातील थॉमस बेजच्या संशोधनात असले तरी पुढे ते असमर्थित निष्कर्षामुळे काहीसे अप्रिय ठरले. तथापि, जेफ्री आणि इतरांनी त्यामध्ये अधिक संशोधन केले तर डॉ. हुजुरबाजार यांनी सफिशीएंट स्टेंटीस्टीक्स आणि एक्स्पोनेनशीयल फेमिली यांच्यातील संबंध व इनव्हेरीएंट प्रायर डीस्ट्रीब्यूशन्स (खपींरीळरपीं ि्रीें वळीींीळर्लीींळेपी) यावर आधारित दोन संशोधन लेख लिहिले. या लेखांमुळे डॉ. जेफ्री प्रभावित झाले आणि त्यांनी हुजुरबाजार यांचे संशोधन ऑक्सफोर्ड युनिवर्सिटी प्रेस णे प्रकाशित केलेल्या थेरी ऑफ प्रोबाबीलीटी' च्या तिसऱ्या आवृत्तीत हुजुरबाजार्स इनव्हेरीएंटस' असे नामकरण करून प्रसिद्ध केले. डॉ. हुजुरबाजार हे कमाल संभाव्यता विषयी अनुमान'संभाव्यता वितरणाचे अपरिवर्तनीय घटक आणि पर्याप्त नमुना आकडे आदी प्रमुख संशोधनासाठी परिचित आहेत. इंग्लंडहून भारतात परतल्यानंतर हुजुरबाजार यांनी १९५० ते १९५३ या कालावधीमध्ये गौहाटी, मुंबई व लखनौ विद्यापीठामध्ये अध्यापन कार्य केले. त्यानंतर शासनाच्या आर्थिक आणि सांख्यिकीय संचालनालयामध्ये त्यांनी काही काळ काम केले. त्यानंतर १९५३ मध्ये हुजुरबाजार यांना पुणे विद्यापीठात गणित आणि संख्याशास्त्र विभाग स्थापन करण्यासाठी निमंत्रित केले गेले. तेथे त्यांनी या विभागाला नावारूपाला आणण्यासाठी प्रचंड कष्ट केले. १५ नोव्हेंबर १९९१ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी निधन झाले. त्यांना विनम्र अभिवादन !!

**– प्रा. विजय कोष्टी**

---

**बोधकथा**

## देशभक्तीची परिक्षा




ही गोष्ट आहे स्वातंत्र्यपूर्व काळातील. देशाला लढूनच, प्रसंगी रक्त सांडूनच, हक्कासाठी भांडूनच स्वातंत्र्य मिळेल अशा विचारसरणीचे काही क्रांतीकारक होते. तर अहिंसेच्या मार्गानेच देश स्वतंत्र करता येईल असा काहींना विश्वास होता. एक लहान मुलगाही हे सगळे पाहून देशभक्तीची प्रेरणा घेत होता. आपल्या मुलामध्ये देशभक्ती ठासून भरलेली असल्याचे त्याच्या आईलाही जाणवले तेव्हा तिला खूप आनंद झाला. देश गुलामीच्या जोखडातून मुक्त झाला तर बरे होईल अशी भावना होती. पण मुलगा जर पोलीसांच्या तावडीत कधी सापडला तर जे देशासाठी भूमिगत राहून लढा देत आहेत त्यांची नावे व ठिकाणे तो उघड करेल अशी भीती तिला वाटत राहायची. यासाठी तिने त्या मुलाची परीक्षा घ्यायचे ठरवले. आईने मुलाला जवळ बोलावले व आपल्या मनातील ही भावना त्याला सांगितली. आईने मुलाला परीक्षा घेणार असल्याचेही सांगितले. मुलाने परीक्षेसाठी होकार दिला. आईने दिवा पेटवला व त्याच्या ज्योतीवर त्या मुलाला बोट धरायला सांगितले. त्या मुलाने जराही न घाबरता त्या ज्योतीवर हात धरला. हाताला पोळत असताना आईने त्याला क्रांतीकारकांची नावे सांगण्यास सांगितले पण मुलाने हुं की चूं सुद्धा केले नाही. मुलाचे हे धाडस पाहून आईने मुलाला कवटाळले. हाच मुलगा मोठेपणी एक महान क्रांतीकारक झाला. त्या मुलाचे नाव होते- अशफाक उल्लाह खान

**तात्पर्य :-** असंख्य देशभक्तांनी केलेल्या त्यागामुळे, बलिदानामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले

---

**जन्म हा अखेरचा**

## परकायस्थल - १



म्हणून शरीरधारी असूनही ज्ञानी पुरुष केवळ आत्मानंदात निमग्न असल्यामुळे तो सांसारिक संबंधापासून मुक्त असतो आणि परब्रह्मस्वरूप आत्मा त्याच्या देहात नांदत असल्यामुळे त्याचा देहदेखील परब्रह्मस्वरूपच असतो.

**सम्यग्ज्ञानाग्निसन्दग्धजन्मबीजकलेवर: ।**
**शिवतत्त्वावलम्बी य: परकाय: स उच्यते १६.५१॥**

परकाय कुणाला म्हणतात त्याचे येथे स्पष्टीकरण केले आहे. राग आणि द्वेष यांना जन्माचे कारण मानले जाते. जन्म म्हणजे या प्रपंचात येणे आणि मृत्यू म्हणजे या प्रपंचातून निघून जाणे. एकदा मनुष्यजन्म मिळाल्यानंतर कशीही कर्मे केली तरी पुढला जन्म मनुष्याचाच मिळतो, असा काही लोकांचा समज आहे. परंतु कर्मानुसार पुढील जन्म निश्चित होतो, असे कर्मसिद्धान्त सांगतो. एखाद्या रेडिमेड कपड्याच्या दुकानात तुम्ही जेव्हा जाता तेव्हा तुमच्या मापाचा आणि तुमच्याजवळ असलेल्या पैशांत विकत येईल असाच पोशाख तुम्ही खरेदी करता. तुमच्या मापाचा नसलेला आणि तुमच्या खिशाला न परवडणारा असा पोशाख तुम्ही घेत नाही. त्याप्रमाणेच जणू ईश्वर एका दुकानात सर्व प्राण्यांच्या शरीराकृती घेऊन बसलेला असतो.


**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

---

**जनमानस**

## मोबाईल बंदीबाबत कडक नियम हवेत

प्रत्येक पेट्रोल पंपांवर कुणाच्याही सहजपणे नजरेतून सुटू शकणार नाहीत अशा प्रकारे मोबाईल बंद ठेवावेत असे संदेश स्थानिक,राष्ट्रभाषा आणि इंग्रजी भाषेत लिहिलेले असतात. पण लेखी संदेश कायद्यांच्या पुस्तकांत, भिंतीवर किंवा नोटिशीत



राहतात. एकदा पाहून त्या संदेशाचा अर्थ समजून घेतला नाही तर काय परिणाम होतात हे अनुभवल्या शिवाय समजणारे नसतात. वाहानांत पेट्रोल, डिझेल, गॅस हि ज्वलनशील इंधने भरली जात असताना जवळपास कोणतेही ज्वलनशील पदार्थ नसावेत. मोबाईल्सच्या अदृश्य लहरी आकर्षित तसेच परावर्तित होत असतानाच लहरींचा अजाणतेपणी इंधनाशी संपर्क आल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. वित्त व जीवितहानी होऊ नये म्हणून काळजी घेण्याचे नियम, प्रयत्न दुर्लक्षिले जातात ते वाहन चालक, सहप्रवासी यांच्या बेजबाबदार वर्तनामुळे. पुढे उद्भवू शकणाऱ्या धोकादायक प्रसंगांची जाणीव असूनही बरेच वाहनचालक हेडफोन लावून संभाषण सुरू ठेवतात व स्वत:सह भोवतालच्या लोकांना, पेट्रोल पंपावरील कर्मचारीवर्गाला धोक्यात आणत असतात. तेथील कर्मचारीवर्गाच्या सूचनांना जुमानत नाहीत. बंदीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे अधिकार कुणास असतात, कारवाई करणारी यंत्रणा कोठली याविषयी बरीच संभ्रमता आहे. इंधनाचे पैसे कार्ड्स किंवा ऑनलाईन पेमेंट पद्धतीने करतांना मोबाईल्सचा वापर नाईलाजास्तव मोबाईल्सचा वापर केला जातो. तोपर्यंत बंदीचे नियम जागोजागी दर्शविण्याऐवजी सक्तीची मोबाईल्स बंदी, वाहन चालक मालक, प्रवासी यांनी वाहनांत इंधन भरेपर्यंत वाहनापासून सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक असते. कितीही महत्वाचे जरी असले तरी आपले मोबाईलवरील संभाषण काही मिनिटांसाठी खंडित करणे आवश्यक आहे. पेट्रोलपंप मालकांनी मोबाईल फोनचा वापर करणाऱ्यांना इंधन पुरवठा करण्यास नकार देणे हा पेट्रोल पंपावर मोबाईल बंदीसाठी चांगलाच उपाय ठरू शकतो. सरकारने लवकरच अधिसूचना जाहीर करून याबाबत असलेली संदिग्धता दूर करावी.


**– राजन पांजरी,** जोगेश्वरी.

---

**अभियंता दिन**

## आचरण जपलेला अभियंता

आज १५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो कारण भारतातील पहिले अभियंता भारतरत्न सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचा हा जन्मदिवस. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या हे केवळ अभियंता नव्हते तर ते थोर देशभक्तही होते. आजच्या दिवशी म्हणजे १५ सप्टेंबर १८६१ रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यातील मदनहल्ली या छोट्याश्या गावात त्यांचा जन्म झाला. मोक्षगुडम विश्वेश्वरय्या यांचे वडील विद्वान संस्कृत पंडित होते. घरची परिस्थिती हलाखीची होती तरीही त्यांनी विश्वेश्वरय्या यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. विश्वेश्वरय्या यांनीही गरिबीशी झुंज देत तालुक्याला एकटे राहून आपले शिक्षण अव्वल गुणांनी पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी बंगळुरुला आले. तिथेही त्यांनी विशेष गुणवत्ता मिळवत बी ए केले. पदवीधर झाल्यावर त्यांना तांत्रिक शिक्षणाची आवड निर्माण झाली. पण तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पैसे नसल्याने त्यांनी म्हैसूरच्या राजाला विनंती केली. म्हैसूरच्या राजाने त्यांच्यातील गुणवत्ता हेरून त्यांना अभियांत्रिकी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन पुण्याला पाठवले. विश्वेश्वरय्या यांनीही त्यांच्यावरील विश्वास सार्थ ठरवत अभियांत्रिकी परीक्षेत मुंबई प्रांतात प्रथम क्रमांक पटकावला. या त्यांच्या यशाची दखल घेऊन १८८४ साली सरकारने त्यांना सहाय्यक अभियंता या पदावर नेममुक दिली. तिथेही त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. या काळात त्यांनी खडकवासला धरणासाठी एक अभिनव अशा स्वयंचलित गेटची निर्मिती केली. यामुळे विशिष्ट पातळी वरील अतिरिक्त पाणीच वाहून जाई. अशाप्रकारच्या गेटची निर्मिती भारतात पहिल्यांदाच झाली होती. या डिझाइनचे नाव पुढे विश्वेश्वरय्या गेट असे झाले. १९०७ साली त्यांनी सरकारी नोकरीतून निवृत्ती पत्करली. निवृत्तीनंतर निजाम सरकारने त्यांची विशेष सल्लागारपदी नियुक्ती केली. तिथे त्यांनी हैदराबाद परिसरातील दोन नद्यांवर धरणे बांधून हैदराबाद शहर पुरमुक्त केलेच शिवाय शहराचा कायापालट देखील केला. म्हैसूरच्या राजाने त्यांना मुख्य अभियंता पदाची ऑफर दिली त्यांनी ती स्वीकारली. म्हैसूरचे मुख्य अभियंता असताना त्यांनी तिथे कृष्णराज सागर धरण, वृंदावन गार्डन बांधले तसेच विकासाची अनेक कामे केली. या व्यतिरिक्त त्यांनी उद्योग व शेती सिंचनाची अनेक कामे केली. पाण्याचा अपव्यय टाळून पुरेपूर वापर करणारी ब्लॉक सिस्टीम ही त्यांचीच देणगी आहे. म्हैसूरचे पद सोडल्यावर त्यांनी अभियांत्रिकीच नव्हे तर उद्योग, शेती, नगर सुधारणा या योजनेत मोलाचे कार्य केले. विश्वेश्वरय्या हे उच्चविद्याविभूषित असूनही त्यांचे राहणीमान अतिशय साधी होती. म्हैसूरी पद्धतीचा फेटा आणि साधी वेशभूषा त्यांनी शेवटपर्यंत जपली. त्यांचे व्यक्तिमत्त्वही आकर्षित करणारे होते. ते जितके साधे होते तितकेच ते परखडही होते. अंधश्रद्धा त्यांना मान्य नव्हती. मानवात देव आहे. मानव सेवा हीच ईश्वर सेवा असे त्यांचे मत होते. ते जसे बोलत तसे ते वागतही होते. वयाच्या ९४ व्या वर्षी भारत सरकारने त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविले. विश्वेश्वरय्या हे शतायुषी होऊन निरामय जीवन जगले. १४ एप्रिल १९६२ रोजी वयाच्या १०१ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. पण त्यांनी केलेल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव व्हावा म्हणूनच आजचा दिवस संपूर्ण देशात अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. विश्वगुडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**– श्याम ठाणेदार,**
दौंड जिल्हा पुणे

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## कलीयुगातील दृष्ट चक्र :

# माणसानंतर आता मुके प्राणीही होम कॉरंटाईन

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी


कोरोना विषाणू महामारीने जग उध्दवस्त केले. कुटुंबाच्या कुटुंब निस्तनाबूत झाली. कित्येक कुटुंब कायमची संपली. कोरोना विषाणू संक्रमित होऊ नये, यासाठी कोरोना महामारीच्या काळात कोरोना बाधितांना होम कॉरंटाईन करण्यात आले. दरम्यान आता जनावरांमध्ये लम्पि त्वचा व्हायरस आजाराची साथ आली आहे. हा संसर्गजन्य आजार असल्याने त्याचं संक्रमण होऊ शकते. एका जनावरापासून इतर जनावरांमध्ये हा आजार पसरू शकतो. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या आजाराची लक्षणे दिसलेल्या जनावरांना आता होम कॉरंटाईन करून ठेवले जात आहे.

जिल्ह्यात मंगळवेढा तालुक्यात लंपी त्वचा व्हायरस आजाराची लक्षणे दिसत असलेली जनावरे आढळून येत आहेत, या साथीच्या आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी पशुवैद्यकीय विभागाने, जनावरांना होम कॉरंटाईन करण्याचा मार्ग पशू पालकांना



सांगितला आहे. लंपी त्वचा वायरस आजाराच्या पार्श्वभूमीवर, अनेक ठिकाणी जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत लसीकरण केले. जात आहे.

### पशु वैद्यकीय तज्ञ डॉ. सोनिया कांबळे नेमके काय म्हणाल्या लंपी संदर्भात...?



✻ जनावरांमधील लंपी त्वचा व्हायरस आजार माणसांमध्ये संक्रमित होत नाही ✻ नागरिकांनी विनाकारण घाबरून जाण्याचे कारण नाही ✻ या आजाराच्या अफवांवर अजिबात विश्वास ठेवू नये ✻ या आजाराचा आणि दूध तसेच दुग्धजन्य पदार्थाचा संबंध नाही, दूध आणि दुग्धजन्य पदार्थ आवश्यक खावेत ✻ या आजाराने जनावरांचा मृत्यू होण्याचे प्रमाण शेकडा एक ते दोन टक्के इतका आहे ✻ आजाराची जनावरे पहिल्यांदा आढळली राजस्थानमध्ये ✻ महाराष्ट्रात विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी जनावरांना या आजाराची बाधा झाल्याची माहिती समोर येत आहे ✻ लंपी त्वचा व्हायरस आजाराबद्दल नागरिकांमध्ये जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे ✻ या आजाराबद्दल पशुपालकांनी दक्षता घ्यायला हवी, मात्र घाबरून जाण्याचे कारण नाही ✻ लंपीचा प्रादुर्भाव होऊ नये यासाठी प्रतिबंधक लस्सींची मात्र जनावरांना टोचून घ्यावी.

### अफवांच्या पिकांनी शेतकरी देशोधडीला लागतील



मागच्या काही वर्षात बर्ड फ्लू नावाचा संसर्गजन्य आजार कोंबड्यांमध्ये आला होता, या आजाराने पोल्ट्री व्यवसायाची अक्षरशः वाट लागली. बर्ड फ्लू नसतानादेखील केवळ अफवा आणि भीतीमुळे नागरिकांनी चिकन आणि अंडी खाणे बंद केले, शिवाय बर्ड फ्लू पसरण्याच्या भितीने लाखो कोंबड्यांची जमीन गाडुन विल्हेवाट लावली. यातुन हा व्यवसाय पूर्णपणे उध्वस्त झाला. तद्वतच आता जनावरांमध्ये लंपी त्वचा व्हायरस आजार आला आहे, या संदर्भातील चुकीच्या अफवांनी काही ठिकाणी नागरिकांनी दूध आणि दुग्धजन्य पदार्थ खाणे बंद केले आहे. चुकीच्या अफवा नागरिकांनी मनावर घेतल्यास दूध व्यवसायाची वाट लागणार आहे. पशुपालक पर्यायाने शेतकरी देशोधडीला लागतील.

**–अनिल अवताडे,** पशू पालक आणि दुग्ध व्यावसायिक विरवडे बुद्रुक, तालुका मोहोळ

---




## सिध्देश्वर बँकेची वार्षिक सभा संपन्न

✔ सुराज्य/सोलापूर

येथील सोलापूर सिध्देश्वर सहकरी ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मार्केट यातील के. अप्पासाहेब काडादी सभागृहात बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. या बैठकीत सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

बँकचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे व इतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून समेस सुरुवात करण्यात आली. बँकेचे चेअरमन प्रकाश वाले यांनी बँकेचा प्रगतीचा अहवाल उपस्थित सभासदांपुढे मांडला. यंदाच्या वर्षी बँकेला करपूर्व नफा . ९ कोटी ८४ लाख व तरतुदी वजा जाता रु. ४ कोटी २३ लाख इतका निव्वळ नफा झाल्याचे सांगितले. त्यानंतर बँकेच्या सभासदांना सहकार खात्याचे अधिकारी जितेंद्र चव्हाण यांनी ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सभासदांची कर्तव्ये यावर मार्गदर्शन केले. बँकेच्या अधिकृत वेबसाईटचे उदघाटन बँकेचे मार्गदर्शक मा. श्री. राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते करण्यात आले. सभेच्या विषय पत्रिकेवरील विषयांचे वाचन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राम शर्मा यांनी केले. यावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. यावेळी बँकेचे सभासद

**सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर**

मोहन नारा, भुसार आडत संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी, मार्केट कमिटी बँकेचे मार्गदर्शक राजशेखर शिवदारे यांनी कोविड काळात देखील बँकेने कर्जवाटप आणि कर्ज वसुली करून चांगला नफा मिळवून सभासदांना १० टक्के डिव्हिंडड जाहीर केल्याबद्दल संचालक मंडळाचे आभार मानले. तसेच सभासदांनी ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे त्याच कारणासाठी वापर करून कर्जाची परतफेड वेळेवर करण्यासाठी आवाहन केले. यावेळी बँकेचे संचालक तुकाराम काळे, मल्लिनाथ विभूते, चंद्रकांत रमणशेट्टी, अशोक लांबतुरे, पशुपतीनाथ माशाळ, नागनाथ जावळे, श्रीशैल बनशेट्टी, तज्ञ संचालक श्रीधर रिसबूड, ॲड. मल्लिनाथ पाटील मार्केट यार्डातील सर्व व्यापारी संघटनाचे पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल न आल्याने डीपीसी बैठक प्रलंबित

### आयुक्त पी. शिवशंकर यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका बहुतांश कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल (सी. आर. / कॉन्फिडन्शियल रिपोर्ट) प्राप्त झाले नसल्यामुळे महापालिकेतील पदोन्नती संदर्भातील डीपीसी बैठक प्रलंबित असल्याचे स्पष्टीकरण महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिले.

गेल्या अडीच - तीन वर्षापासून सोलापूर महापालिकेतील डीपीसीची बैठक झाली नाही. यामुळे पदोन्नतीचा निर्णय खोळंबला आहे. या संदर्भात विचारले असता महापालिका आयुक्तांनी ही



माहिती दिली.

सोलापूर महापालिकेतील कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल अद्याप प्राप्त झाले नसल्याने डीपीसी बैठक घेण्यास अडचण आहे. गोपनीय अहवाल पाठविण्यासंदर्भात



यापूर्वी सूचना दिलेल्या आहेत. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर डीपीसी घेण्यात येईल असेही महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी सांगितले. दरम्यान, सोलापूर महापालिकेत दिनांक ९ जानेवारी २०२० नंतर डीपीसी ची बैठक झाली नाही. यामुळे न्याय्य हक्क असतानाही सुमारे २५० कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पदोन्नती रखडल्या आहेत. यामध्ये सुमारे १५ दिव्यांग कर्मचारी व अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. डीपीसी बैठकच नसल्याने या पदोन्नती रखडल्या आहेत. यासंदर्भात संघटनांकडूनही वेळोवेळी मागणी होत आहे.

### सेवकांनी आता गोपनीय अहवाल परिपूर्तीसाठी प्रयत्न करण्याची गरज

सोलापूर महापालिकेच्या प्रशासकीय विविध विभागातील खाते प्रमुखांनी त्या त्या कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल वेळेत पाठविणे गरजेचे आहे मात्र तसे झाले नाही. अनेक कर्मचाऱ्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. दरम्यान काही खाते प्रमुख आता निवृत्त झाले आहेत. त्यामुळे ही अडचण आहे. खाते प्रमुखांबरोबरच आता संबंधित सेवकांनी आता गोपनीय अहवाल परिपूर्तीसाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, असे कामगार नेते चांगदेव सोनवणे यांनी सांगितले.

## नवरात्रोत्सव जल्लोषात साजरा होणार : चाकोते

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहर मध्यवर्ती नवरात्र महोत्सव मंडळाची सर्वसाधारण सभा आज गुरूवार १५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता शिवानुभव मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष विश्वराज चाकोते यांनी दिली.

यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा झाला त्याच प्रमाणे यंदाचा नवरात्रोत्सवही साजरा करण्याचे आहे. शक्तीदेवीची उपासना करण्यासाठी अवघ्या काही दिवसावर आलेल्या नवरात्रोत्सवाची तयारी आणि मध्यवर्ती मंडळाचे नूतन पदाधिकारी नियुक्तीसाठी बैठक आयोजित करण्यात आली असून सर्व देवी भक्तांनी या बैठकीला उपस्थित राहावे असे आवाहन यावेळी अध्यक्ष विश्वराज चाकोते यांनी केले.

## लंम्पी आजार नियंत्रणासाठी जि.प. पशुसंवर्धन विभाग सज्ज : नरळे

### माळशिरस तालुका वगळता लंपी आजार जिल्ह्यात नियंत्रणाखाली

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर लंपी आजाराने जनावरे बाधित होऊ नये यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग सर्व यंत्रणेसह सज्ज असल्याचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी तानाजी नरळे यांनी दैनिक 'सुराज्य'च्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले जिल्ह्यात छोटे-मोठे मिळून एकूण जनावरांची संख्या १२ लाख ४१ हजार इतकी असून आतापर्यंत केवळ जिल्ह्यातील माळशिरस तालुका वगळता आजाराची लागण जिल्ह्यात कुठेही झाले नसून आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार दहा जनावरे बाधित झाली आहेत जनावरांना उपचार केल्यानंतर जनावरांची प्रकृती चांगली असल्याचे नरळे यांनी सांगितले लंबी हा आजार होऊ नये यासाठी जवळपास २१ हजार लस उपलब्ध असल्याच सांगण्यात आले जी जनावरे बाधित आहेत अशा जनावरापासून इतर जनावरे वेगळ्या ठिकाणी ठेवण्याची सोय करावी तसेच तो आजार होऊ नये म्हणून प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याने आपापल्या जनावरांना विविध प्रकारचे लस टोचून . घ्या. जाराचा सामना करण्यासाठी आवश्यक लस औषधी साधन सामग्री आधी विविध बाबींची उपलब्धता करण्यात आल्याचे सांगण्यात

महाराष्ट्र शासनाने लंपी आजारावर लस देण्याची प्रक्रिया जिल्ह्यात तातडीने राबवावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे नागप्पा सिंदगी व रावसाहेब शहाणे यांनी बुधवारी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्याकडे केले. या संसर्गामुळे पशुधन दगावल्यास शेती व्यवस्थापनाचा डोलारा विस्कळीत होईल अशा प्रकारचे निवेदन भारतीय किसान संघाचे प्रांत उपाध्यक्ष रावसाहेब शहाणे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले.

आले पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे ही बाहेर स्तोत्राद्वारे भरण्यात येणार आहेत तसेच पशुधन विकास अधिकारी गट यांचीही रिक्त पदे लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन नियमित स्वरूपात भरेपर्यंत किंवा अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी मानधनावर बाहेर सेवा द्वारे भरवण्यात येणार आहेत तसेच जिल्ह्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी डॉक्टरांची गरज भाषण त्या त्या ठिकाणी पशुसंवर्धन पीएससीचे डॉक्टर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत या आजाराची परिस्थिती नियंत्रणासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून हा आजार इतर जनावरांना होऊ नये म्हणून सर्वतोपरी काळजी पशुसंवर्धन विभाग घेत आहे आतापर्यंत उपलब्ध लसीकरण हिंगोली बजेरी काळमवाडी प्रकारच्या लसी उपलब्ध असल्याचे डॉक्टर नरळे यांनी सांगितले.

## पनाश टॉवर प्रकरणी महापालिका शासनाचे मार्गदर्शन मागविणार


✔ सुराज्य/सोलापूर : विजापूर रोडवरील नियोजित १७ मजली पनाश टॉवर प्रकरणी आता राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात येत असल्याची माहिती महापालिका आयुक्त यांनी बुधवारी दिली.



शहरातील विजापूर रोडवरील नियोजित तब्बल १७ मजली पनाश टॉवर बांधकाम प्रकरणी पुण्यातील गॅलोर कंपनीला महापालिका प्रशासनाच्यावतीने आयुक्त पी. शिवशंकर यांनी कारणे दाखवा नोटीस बजाविली होती. या नोटिसीचे उत्तर वजा खुलासा या कंपनीने सोलापूर महापालिकेला दिला. दरम्यान, सोलापूर महापालिकेचे नगररचना विभागाचे (एडीटीपी) संचालक संभाजी कांबळे यांनी त्यावर अभ्यास करण्यासाठी दोन दिवसाचा अवधी मागितला होता. मुद्देनिहाय अभ्यास करण्यात येणार होता. त्यानंतर दोन्ही बाजू तपासण्यात येतील. महापालिका स्तरावर निर्णय घेण्यात येईल. आवश्यक वाटल्यास राज्य शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येईल असे महापालिका आयुक्त पीस शिवशंकर यांनी दोन दिवसापूर्वी स्पष्ट केलं होतं. अकॉमडेशन रिझर्वेशन आणि युडीपीसीआर या दोन्ही पध्दतीच्या आधारावर वेळोवेळी परवानगी मागितली होती. पनाश टॉवरमध्ये या कंपनीने नियमाप्रमाणे महापालिकेला १६०० स्क्वेअर मीटर जागा देणे गरजेचे होते मात्र आतापर्यंत ५०० स्क्वेअर मीटर जागाच महापालिकेला मिळाली आहे. नियमाप्रमाणे महापालिकेचा हिस्सा दिला का आणि एफएसआय ( चटई निर्देशांक) किती वापरला या संदर्भात महापालिकेने नोटीस बजावली होती. दरम्यान खुलाशावर अभ्यास झाला का पुढील दिशा काय या संदर्भात पत्रकारांनी विचारले असता महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी याप्रकरणी राज्य शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात येत असल्याचे बुधवारी स्पष्ट केले. शासनाने डीपी बनवत असताना नेमके काय अभिप्रेत होते. अकॉमडेशन रिझर्वेशन दिल्यानंतर युडीपीसीआर प्रमाण प्रमाणे परवानगी देता येते का? यासंदर्भात राज्य शासन मार्गदर्शन करू शकते त्यामुळे याप्रकरणी शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त यांनी सांगितले. यासंदर्भात शासनाचे स्पष्टीकरण आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही आयुक्तांनी सांगितले. एकूण क्षेत्रफळाच्या १५ टक्के की ३० टक्के पैकी पंधरा टक्के जागा महापालिकेला द्यावयाची हाही मुद्दा तपासावा लागेल. त्यासाठी स्पष्टीकरणाची गरज असल्याचेही आयुक्त पी. शिवशंकर यांनी नमूद केले.

## निधन वृत्त

### धोंडाबाई खटके



✔ सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील नरोटेवाडी येथील धोंडाबाई गोकुळ खटके (वय ८५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पश्चात एक मुलगा, सून, दोन नाती व एक नातू असा परिवार आहे.

### रागिनी धुमाळ



✔ सुराज्य/तुळजापूर : रागिनी श्रीकांत धुमाळ (वय ६०) यांचे दि. १३ मंगळवार रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली एक मुलगा सुना नातवंडे असा परिवार आहे. जवाहर तरुण मंडळाचे जेष्ठ सदस्य श्रीकांत धुमाळ यांच्या त्या पत्नी होत्या.

### सुभाष सपाटे



✔ सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सुभाष विश्वनाथ सपाटे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी सुना नातवंडे असा परीवार आहे.

### शंकरेप्पा बिराजदार



✔ सुराज्य/हत्तरसंग : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथील माजी सैनिक शंकरेप्पा शरणप्पा बिराजदार (वय ८२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन मुली, मुलगा, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## हालहळ्ळी (अ) परिसरात अतिवृष्टीचे पंचनामे युध्दपातळीवर

✔ सुराज्य/अक्कलकोट


अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी(अ), चपळगाववाडी, दहिटणेवाडी व चपळगाव परिसरात अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांच्या पंचनामा युध्दपातळीवर सुरु आहे. या पंचनामा टीम मध्ये संबंधित तलाठी, कृषि अधिकारी, ग्रामसेवक, मंडल अधिकारी आदी प्रशासकीय कर्मचारी शेताच्या बांधावर जाऊन पंचनामा करताना दिसून येत आहेत. बाधित झालेल्या पिकांचे नोंद घेण्यासाठी कृषी कार्यालयातील कृषी सहाय्यक व तलाठी यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आले आहे. यामुळे एका तलाठी व कृषि सहायकाला सात ते आठ गावांचा पंचनामा करावा लागत आहे. याच बरोबर कृषी सहाय्यक ला पीक कापणी तक्ते, महाडीबीटी आदी कामे ही त्यांना पार पाडावी लागत आहे. यामुळे कृषी सहाय्यकावर सध्या कामाचा ताण वाढताना दिसून येत आहे. अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ज्या शेतकर्यांच्या शेतात पिकांचे नुकसान झाले आहे यासाठी पंतप्रधान फसल विमा योजना अंतर्गत आग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी पिकाच्या नुकसानीचे ७२ तासाच्या आत कळवणे बंधनकारक आहे.

## पंढरपूर एमआयडीसी संदर्भात उद्या मुंबईत बैठक

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर येथे अनेक वर्षांची एमआयडीसी स्थापन करण्याची मागणीला आता यश येण्याची शकता निर्माण झाली आहे. उद्या १५ सप्टेंबरला मुंबई येथे यासंदर्भात बैठक बोलावली असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली. पंढरपूर नजीक रांजनी आणि कासेगाव येथील जागेचा प्रस्ताव एमआयडीसीसाठी देण्यात येणार आहे.

गुरूवारच्या बैठकीला औद्योगिक वसाहतीचे अधिकारी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्यासह सांगली कार्यालयाचे तसेच भूसंपादन विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. दुपारी एक वाजता सामंत यांच्या कार्यालयात ही महत्वपूर्ण बैठक होत आहे. पंढरपूर तालुक्यातून सहा राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जाचे रस्ते जात आहेत. येथे वीज तसेच पाणी मुबलक उपलब्ध असून जागा ही येथे मिळू शकते. यासाठी काही जागा पाहण्यात आल्या आहेत. पंढरपूरचा विकास मोठ्या प्रमाणात होत असताना येथे अभियांत्रिकी महाविद्यालय, आयटीआय



यासारखी महाविद्यालय आहेत. मात्र शिक्षण घेवून येथील तरूणांना नोकरीसाठी बाहेर जावे लागत आहे. यासाठी एमआयडीसी ची मागणी सतत होत होती. आपण आमदार झाल्यापासून सतत महाविकास आघाडी सरकारकडे ही मागणी लावून धरली होती. मात्र आता राज्यात शिंदे व फडणवीस यांचे सरकार आल्यानंतर या मागणीचा यश येताना दिसत आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यासाठी पुढाकार घेत बैठक बोलाविली असल्याचे आवताडे यांनी सांगितले. दरम्यान मंगळवेढ्यातील २४ गावांसाठीच्या सिंचन योजनेला लवकरच मंत्रिमंडळाची मंजुरी मिळेल असे आवताडे यांनी स्पष्ट केले. याबाबत संबंधित विभाग काम करत असून येत्या किंवा त्यापुढील मंत्रिमंडळ बैठकीत यास मंजुरी मिळेल. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात ही योजना राबविणार असल्याचे जाहीर केले आहे.

### पंढरपूरात बुलडोझर चालवू देणार नाही

पंढरपूर शहरात नव्याने तीर्थक्षेत्र विकास आराखडा राबविला जात असून याची बैठक नुकतीच झाली आहे. हा आराखडा राबविताना पंढरपूरच्या नागरिकांना संपूर्ण विश्वासात घेवूनच काम केली जातील. कोणाचे नुकसान होवू दिले जाणार नाही. कोणाच्या घरावर बुलडोझर चालवू देणार नाही. याबाबतीत जनतेच्या पाठीशी असल्याची आ. आवताडे यांनी दिली.

CMYK

# यंदाचा युवा महोत्सव दामाजी नगरीत

▸ कदम गुरुजी महाविद्यालयात ७ ते १० ऑक्टोबर रोजी आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा अठरावा युवा महोत्सव दामाजी नगरीत होणार आहे. मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालयात ७ ते १० ऑक्टोबर २०२२ रोजी हा युवा महोत्सव होणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी बुधवारी दिली.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून युवा महोत्सवाच्या यजमानपदासाठी प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार मंगळवेढा येथील दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालयाकडून युवा महोत्सव घेण्यासाठी प्रस्ताव आला होता. त्यानुसार समितीने संबंधित महाविद्यालयास भेट देऊन यंदाच्या महोत्सवाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली आहे.

कोरोनामुळे गतवर्षीचा युवा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने पार पडला. त्यापूर्वीचा महोत्सव कोरोनामुळे रद्द झालेला होता. आता दोन वर्षाच्या कालावधीनंतर ऑफलाइन पद्धतीने युवा महोत्सव होणार आहे.




त्याचबरोबर यंदाच्या वर्षापासून युवा महोत्सवात कथाकथन आणि काव्यवाचन या कलाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार यंदाच्या युवा महोत्सवात एकूण २९ कलाप्रकारांचे सादरीकरण पहावयास मिळणार आहे. ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची व संघाची प्रवेशिका देणे आवश्यक आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी दिली.

### ■ कलाकार विद्यार्थ्यांचे वय २५ वरून २७

भारतीय विश्वविद्यालय संघाकडून प्राप्त सूचनेनुसार काही बदल यंदाच्या युवा महोत्सवात करण्यात आले आहेत. त्यानुसार या वर्षासाठी युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी युवा विद्यार्थी कलाकारांची वयोमर्यादा २५ वर्षावरून २७ इतकी करण्यात आली आहे. त्याचबरोबर २ संघ व्यवस्थापक, ३ व्यावसायिक साथीदार आणि विद्यार्थी मिळून एकूण ४९ जणांच्या संघाची प्रवेशिका यंदा स्वीकारली जाणार आहे.

### ■ विद्यार्थी कलाकारांनो तयारीला लागा

युवा विद्यार्थी कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील सृजनरंगाला एक हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी विद्यापीठाकडून दरवर्षी युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यासाठी विद्यार्थी कलाकारांचा देखील मोठा प्रतिसाद दरवर्षी महोत्सवाला लाभतो. त्यामुळे हा युवा महोत्सव अधिकाधिक दर्जेदार होत आहे. संलग्नित महाविद्यालयातील युवा विद्यार्थी कलाकारांनी महोत्सवात सहभागी होण्यासाठी आतापासूनच तयारीला लागा असे आवाहन कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी केले.

## मंद्रुप पोलिसांनी सीना-फॅब्रिकेशन व्यावसायिकांची घेतली बैठक

✔ **दक्षिण सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील सीना-भीमा खो-यातील फॅब्रिकेशन व्यवसायकांची बैठकीचे आयोजन मंद्रुप पोलीस स्टेशन येथे साहायक पोलीस निरीक्षक रविंद्र मांजरे यांनी बैठक मालमत्तेचे गुन्हे प्रतिबंध उपायासाठी घेण्यात आली. या वेळी मंद्रुप पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी मंद्रुप पोलीस स्टेशन येथे पोलीस स्टेशन हद्दीतील फॅब्रिकेशन काम करणारे व्यावसायिक यांची मिटिंग घेतली. यामधे दरोडे, घरफोडी, जबरी चोरी, चोरी सारख्या घटनास्थळी पुणे ग्रामीण व सोलापुर ग्रामीण येथे स्थानिक गुन्हे शाखा येथे काम करताना घटनस्थळावरील शटर्स, दारे, खिडक्या, सेफ्टी डोअर, मेन गेट यांचेमध्ये फॅब्रिकेशन करताना काही त्रुटी व वरील गोष्टी बसवण्याच्या चुकीच्या पद्धत यात निष्काळाजीपणा झाल्याचे गुन्हे झाल्याचे निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने गुन्हे प्रतिबंध उपाययोजना म्हणून आज पो. स्टे. हद्दीतील फॅब्रिकेशन काम करणारे व्यावसायिक यांची बैठक घेऊन त्यांना लेखी सुचना दिल्या आहेत. सदर बैठकी करिता ३५ फॅब्रिकेशन व्यावसायिक हजर होते. त्यांनीही सदरच्या सुचनांचा पालन करण्याचे आश्वासन यावेळी सीना भीमा खोऱ्यातील सर्व फॅब्रिकेशन दुकानदारांनी दिले आहेत.

## माजी नगरसेवक बाळू पाटील यांचे निधन

✔ **सोलापूर :** भवानी पेठ, शाहीर वस्ती परिसरातील माजी नगरसेवक राजशेखर उर्फ बाळासाहेब पाटील यांचं बुधवारी अल्पशा आजारानं निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. १९८७ साली ते भाजपचे उमेदवार म्हणून बंडप्पा अण्णा मुनाळे यांच्या विरोधात पराभूत झाले. १९९२ साली ते शंकर मुधोळकर यांच्याकडून पराभूत झाले.

१९९७ साली ते शिवसेनेचे नगरसेवक बनले. २००२ साली ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून सुरेश पाटील यांच्याकडून पराभूत झाले. २००७ साली ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून जगदीश पाटील यांच्याकडून पराभूत झाले. २००८ साली राजू भिंगारे यांचं नगरसेवक पद रद्द झाल्यानंतर घेण्यात आलेल्या पोटनिवडणुकीत राजशेखर पाटील हे जनसुराज्य शक्ती पक्षाकडून नारळ या चिन्हावर विजयी झाले होते. २०१२ साली झालेल्या निवडणुकीत ते काँग्रेसचे उमेदवार म्हणून सुरेश पाटील यांच्याकडून पराभूत झाले. तर २०१७ साली ते भाजपचे उमेदवार विनायक विटकर यांच्याकडून पराभूत झाले.



राजशेखर पाटील हे जागृती नवरात्र महोत्सव मंडळाचे संस्थापक सदस्य आणि विद्यमान ट्रस्टी होते. तसंच रुपाभवानी देवस्थान भक्त मंडळ ट्रस्टचे ते संचालक होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. राजशेखर पाटील हे बाळू पाटील आणि अप्पासाहेब पाटील या नावाने प्रसिद्ध होते. त्यांची अंत्ययात्रा गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता त्यांच्या राहत्या घरापासून निघणार असून, रुपाभवानी स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

## रसायनयुक्त रंगमिश्रित घाण पाण्याचा सोनी नगरला विळखा

### रहिवाशांचे आरोग्य धोक्यात; महापालिका आयुक्तांना दिले निवेदन

✔ **सोलापूर :** अक्कलकोट एमआयडीसीच्या कारखान्यातील रसायनयुक्त रंगमिश्रित ड्रेनेजच्या घाण पाण्याचा सोनी नगरला विळखा झाला असून सर्वत्र दुर्गंधी, दलदल पसरल्याने येथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे. जगणे मुश्कील झाल्याने अखेर नागरिकांनी थेट महापालिका आयुक्तांची भेट घेऊन निवेदनाद्वारे व्यथा मांडली.

आयुक्त साहेब... आमचे जीव वाचवा.... घाण पाण्याची समस्या मिटवा अशी आर्त हाक दिली. सोलापूर शहरातील आकाशवाणी केंद्राच्या पाठीमागे सोनी नगर आहे. गेल्या ८ वर्षांपासून हे लोक इथे राहतात. दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून सोनी नगर परिसरात अक्कलकोट एमआयडीसीच्या यंत्रमाग व इतर कारखान्यातील रसायनयुक्त रंगमिश्रित ड्रेनेजचे घाणपाणी या नगरात येत आहे. ड्रेनेज लाईनचे घाण पाणी उलट प्रवाहीत होऊन या नगरात वाहत येते. ते सर्वत्र रस्त्यावर येते. या घाण पाण्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. मच्छरांचा उपद्रव वाढला आहे. सुमारे ४० ते ५० कुटुंबांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नगरात वावरता येत नाही. जगणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे तातडीने ही समस्या सोडवावी अशी मागणी सोनी नगर येथील नागरिकांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. कामगार सेनेचे विष्णू कारमपुरी यांनी या प्रश्नी पुढाकार घेतला होता. यावेळी कामगार सेनेचे विष्णू कारमपुरी, यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, बालाजी मेतकू गुरुनाथ कोळी, रवी कंटली, देविदास चिंता, आनंद भंडारे, तुकाराम बुलकुले, लक्ष्मी आडकी, राधा आवर, कुमार कोंडा, सतीश क्षीरसागर आदी उपस्थित होते.

**अधिकारी करणार आज पाहणी :** महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सोनी नगर वासीयांच्या समस्या जाणून घेतल्या. गुरुवारी सोनी नगरातील समस्यासंदर्भात महापालिकेचे संबंधित अधिकारी भेट देऊन पाहणी करतील. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी शिष्टमंडळाला दिले.





## भाजीपाल्यांच्या दरात वाढ

कृषी उत्पन्न बाजार समितीकडून बुधवार, १४ सप्टेंबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली. यामध्ये वांगी, ढोवळी मिरची, गवार, काकडी, हिरवी मिरची, लिंबू, मेथी भाजी, शिराळी दोडका, शेपू, पालक, टोमॅटो यांचे दर प्रतिक्विंटल १०० ते हजार रूपयेने वाढले. तर कोबी, कोथिंबीर, गाजर, फ्लॉवर, लसूण, चाकवत, कांदा पात, कांदा, बटाटा, राजगिरा आदींच्या किंमती स्थिर होत्या.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं. ) | जास्तीत जास्त दर (क्विं. ) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ४,००० | ८,००० | ६,००० |
| कारली | १,००० | २,५०० | १,५०० |
| वांगी | ५०० | ३,५०० | २,००० |
| कोबी | ५०० | ८०० | ६०० |
| ढोवळी मिरची | ५०० | २,००० | १,००० |
| गाजर | २,००० | ३,५०० | ३,००० |
| गवार | ४,००० | ६,००० | ५,००० |
| कोथिंबीर | ५०० | १,४०० | ७०० |
| काकडी | १,००० | ३,००० | २,००० |
| फ्लॉवर | ६४० | १,२०० | ८०० |
| लसूण | १,००० | ३,५०० | १,७०० |
| घेवडा | ३,००० | ३,५०० | ३,००० |
| हिरवी मिरची | २,००० | ३,००० | २,५०० |
| अंबाडी भाजी | ५०० | ६०० | ५०० |
| कांदा पात | ४०० | ७०० | ५०० |
| बटाटा | ८०० | २,५५० | १,०५० |
| राजगिरा | ३०० | ६०० | ४०० |
| लिंबू | ३,००० | ६,२५० | ५,००० |
| तांदूळ | ३,००५ | ६,३०० | ३,७५० |
| दोडका | १,५०० | ३,५०० | २,००० |
| शेपू | ५०० | ७०० | ६०० |
| ज्वारी | २,५८५ | २,६२५ | २,६०५ |
| पालक | ५०० | ८०० | ६०० |
| टोमॅटो | २०० | २,१०० | ८०० |
| गहू | २,३०० | ३,२८५ | २,६६५ |

## स्वेरीचे डॉ.बी.पी.रोंगे यांनी ग्रामीण भागात तंत्रज्ञानाची ज्ञानगंगा पोहचवली : प्रा.पाटील

### किमया अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची या तंत्र-प्रदर्शनाचे उदघाटन

✔ **सोलापूर :** 'स्वेरीच्या किमया अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची' या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची तंत्रज्ञानाशी ओळख होत असून सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करावा कारण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान व अभियांत्रिकी तंत्रज्ञान या बाबींचे ज्ञान फारसे अवगत नसते. यासाठी त्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची माहीती होऊन त्यात आवड निर्माण व्हावी.

या हेतूने स्वेरी मध्ये किमया अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची' या तंत्र-प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात विविध उपक्रम राबवत असताना स्वेरीच्या डॉ.बी.पी.रोंगे सरांनी ग्रामीण भागातील उंबऱ्या-उंबऱ्यापर्यंत तंत्रज्ञानाची ज्ञानगंगा पोहचवली.' असे प्रतिपादन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयात किमया अभियांत्रिकी तंत्रज्ञानाची' या विज्ञान व तंत्रज्ञाना बाबतीत १४, १५, व १६ सप्टेंबर रोजी तीन दिवसीय भव्य प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या उपक्रमाच्या उदघाटन प्रसंगी प्रदर्शन पाहण्यासाठी बाहेरून आलेल्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांना प्रा. पाटील बहुमोल मार्गदर्शन करत होते. दीपप्रज्वलनानंतर प्रा. संदिपराज साळुंखे यांनी स्वेरींचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असून या पंचवीस वर्षातील, तांत्रिक, संशोधन, प्लेसमेंट आदी विभागात झालेल्या प्रगतीचा आलेख सादर केला. प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा. ए.ए.मोटे यांनी स्वेरीच्या प्लेसमेंटची वाटचाल सांगून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण झाल्यानंतर करिअर करण्यासाठी व कंपनीमध्ये रुजू करून घेताना कोण कोणते गुण आवश्यक असतात? याची माहिती दिली. तसेच भविष्यात अभियांत्रिकीत प्रवेश घ्यायचा झाला तर लागणाऱ्या आवश्यक बाबी, त्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक सुविधा, वसतिगृह व्यवस्था याबाबत आवश्यक माहिती दिली. सलग तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनासाठी स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज प्रा. एम.एम. पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्व अधिष्ठाता व विभागप्रमुख यांच्या नेतृत्वाखाली प्राध्यापक वर्ग परिश्रम घेत आहेत. यावेळी विविध महाविद्यालयातून आलेले प्रा. उर्मिला भोसले, प्रा. प्रियांका चव्हाण, प्रा. संजय काटकर, प्रा. महांकाळ, प्रा. देशमुख, प्रा. शोभनतारा मेटकरी, प्रा. वायदंडे, आदी शिक्षक व्यासपीठावर उपस्थित होते.





## जाहीर दरपत्रक

### श्वान खाद्य/औषध खरेदीबाबत

पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर आस्थापनेवरील गुन्हे शाखा, व बीडीडीएस पथक सोलापूर शहरकडील श्वानास लागणारे खाद्य/औषध खरेदी करण्याकरीता दिनांक ०१/१०/२०२२ ते ३०/०९/२०२३ या कालावधीकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. इच्छुक व्यावसायिक यांनी उपरोक्त खरेदीच्या अनुषंगाने अधिक माहितीसाठी या कार्यालयाचे खालील नमूद संकेतस्थळावर भेट द्यावी. **www.solapurcitypolice.gov.in** याच संकेत स्थळावर दिनांक १६/०९/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून सदरची दरपत्रके दिनांक २५/०९/२०२२ पर्यंत सादर करावीत.

**मा. पोलीस आयुक्त,**
**यांच्या मान्यतेने..**

सही/- **(डॉ. दिपाली धाटे)**
पोलीस उप-आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे करीता

विमाका-पुणे/जाही-१२०-२०२२-२३


## आ. देशमुख यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे नुकसानीत झालेल्या पिके-फळबागाचे पंचनामा करुन शासकीय मदत द्यावी, अशा सूचना आ. सुभाष देशमुख यांनी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना दिल्या आहेत. गेल्या दोन- तीन वर्षात शेतकऱ्यांवर अनेक संकटे आली आहेत. शेतकरी त्यातून कसाबसा मार्ग काढत असतानाच आता अतिवृष्टी झाल्याने त्यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM RE-TENDER NOTICE**

| Sr. No. | Tender No. | Tender Detail | Tender / Enquiry RFX Number | Amount in Rs. | EMD | Tender Fee | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/(O&M)/SUR/SRM/T/No.T-10/2022-23 | SRM Re-Tender of rate contract for the Work of Overhauling & Servicing of 33/11KV Circuit Breaker of AREVA/ALSTOM Make available at various 220/132/110KV substations under jurisdiction of Trans O & M Division, Solapur. | RFX No:- 7000024386 **(IInd CALL)** | Rs. 10,00,000/- Including Taxes. | 10000/- | Rs. 525/- including GST | From Dtd. 14.09.2022 @ 09:00 Hrs To Dtd.22.09.2022 up to @ 23:00 HRs |
| 2 | EE/EHV/O&M/DN/SHP/T-12/2022-23 | SRM Re-Tender for the Work of Filtration of Transformer oil of various Power Transformers/ ICT's & OLTC's available at various 220/132/110KV substations under jurisdiction of Trans O & M Division, Solapur. | RFX No:- 7000024388 **(IInd CALL)** | Rs. 10,00,000/- Including Taxes. | 10000/- | Rs. 525/- including GST | From Dtd. 14.09.2022 @ 09:00 Hrs To Dtd.21.09.2022 up to @ 23:00 HRs |

For more details please visit SRM website:- **www.mahatranasco.in** or **https//;srmetender.mahatransco.in**

**Contact Details :-** Executive Engineer- 7447440608
Dy. Executive Engineer - 7447441043

Sd/-
**Executive Engineer**
**EHV O & M Division, Solapur**



## जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
## उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ३, सोलापूर

**पत्ता :- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत पहिला मजला अ विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर ४१३००३**
फोन नं - ०२१७-२३२०१९० ई-मेल - slao3solapur@ gmail.com/slao3-rfsol-mh-gov.in

क्र.२०२२/उभूसं/३/कावि-२/आरआर-३७९/२०२२ दिनांक ०६/०९/२०२२

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना विशेषत: पंढरपूर तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते को, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्रमांक ९, मंगळवेढा यांनी मौजे वाडीकुरोली, ता. पंढरपूर तालुक्यातील उजनी उजवा कालवा वितरिका क्र. २१ उपलघूवितरिका क्र. ३ करिता एसआर क्र. ७७/१९९५ अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण/०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५, क्र. संकीर्ण/०३/२०१५/ प्र.क्र.३४/अ-२ दि. ३०/०९/२०१५ प्रमाणे व परिपत्रक क्र. एलक्युएन/०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि. २५/०१/२०१७ मध्ये खालील अनुसूचीमधील क्षेत्र खासगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन खासगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित केले आहे.

सदर बाबत जमिनीतील हक्क, हितसंबध इत्यादी बाबत हरकत असल्यास वा जमिनीच्या खरेदीदाराच्या अनुषंगाने म्हणणे मांडावयाचे असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून पंधरा दिवसाचे आत समक्ष अथवा रजिष्टर्ड पोस्टाने कार्यालयीन वेळेत पोहचेल अशा रितीने उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक - ३, सोलापूर या कार्यालयाकडे लेखी म्हणणे/ हरकत सादर करावी, अन्यथा खालील अनुसूचीत स्तंभ ३ मध्ये नमुद जमीन स्तंभ २ मध्ये नमूद जमीन मालकाची निर्वेध व निजोखमी मिळकत असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

### अनुसूची

**संपादन संस्थेचे नांव :- कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र.९ मंगळवेढा**
**संपादनाचे प्रयोजन :- उजनी उजवा कालवा वितरीका क्र. २१ उपलघुवितरीका क्र.३ करिता**
**गाव- वाडीकुरोली ता.पंढरपूर जि.सोलापूर**

| अ. क्र. | भूधारकाचे नांव | गट नं./ सर्व्हे नं. | जमिनीचा प्रकार | खरदी करावयाचे क्षेत्र हे. आर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **एस आर क्र. ७७/९५** | | | |
| १ | राजाराम लक्ष्मण काळे व इतर १ | १२७ | बागायत | ०.१६ |
| २ | समाधान अर्जुन काळे व इतर ८ | १२६ | बागायत | ०.०४ |
| ३ | आण्णा बाळू काळे व इतर १ | १२५ | बागायत | ०.०४ |
| ४ | राजकुमार बाळू काळे | १२४ | बागायत | ०.०८ |
| ५ | रामचंद्र बाबू काळे व इतर ४ | ११८ | बागायत | ०.०५ |
| ६ | लतीका सत्यवान काळे व इतर २ | ११७ | बागायत | ०.०३ |
| ७ | सुधाकर नानासो काळे व इतर १ | ११५ | बागायत | ०.०३ |
| ८ | तुकाराम धोंडीबा नाईकनवरे व इतर ४ | ११४ | बागायत | ०.०३ |
| ९ | सुधीर सर्जेराव नाईकनवरे | ११३ | बागायत | ०.०६ |
| १० | तानाजी सोपान ताटे व इतर २ | ११२ | बागायत | ०.०६ |
| ११ | जगन्नाथ ज्ञानोबा ताटे व इतर १४ | १११ | बागायत | ०.०८ |
| १२ | वंदना बाबूराव काळे व इतर २ | ११० | बागायत | ०.०८ |
| १३ | पांडूरंग ज्ञानोबा वाघ व इतर १ | १०९ | बागायत | ०.०६ |
| १४ | पांडूरंग ज्ञानोबा वाघ व इतर १ | १०८/ब | बागायत | ०.०४ |
| १५ | दत्तात्रय ज्ञानोबा वाघ | १०८/अ | बागायत | ०.०३ |
| १६ | जमुनाबाई महादेव पाटील | १०७ | बागायत | ०.०७ |
| १७ | भिवाजी प्रकाश शिंदे व इतर १ | १०६ | बागायत | ०.०६ |
| १८ | औदुंबर सुखदेव काळे व इतर १ | १०५/३ | बागायत | ०.०२ |
| १९ | सौदागर सुखदेव काळे | १०५/२ | बागायत | ०.०२ |
| २० | दिगंबर सुखदेव काळे व इतर १ | १०५/१ | बागायत | ०.०२ |
| २१ | रामचंद्र महादेव पाटील | १०४ | बागायत | ०.०२ |
| २२ | औदुंबर सुखदेव काळे | १०३ | बागायत | ०.०४ |
| २३ | नवनाथ शंकर काळे व इतर १ | १०१ | बागायत | ०.०५ |
| २४ | बाळासो नामदेव काळे | १०० | बागायत | ०.०५ |
| २५ | धनाजी नामदेव काळे व इतर २ | ९३/२ | बागायत | ०.०७ |
| २६ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ९३/१ | बागायत | ०.०६ |
| २७ | अधिकार अभिलेखाप्रमाणे | ९३ पै | बागायत | ०.०३ |
| २८ | संजय नामदेव काळे व इतर ५ | ९२ | बागायत | ०.१५ |
| २९ | श्रीधर नन्हापा काळे | ९१/१ | बागायत | ०.०३ |
| ३० | भास्कर नन्हापा काळे | ९१/२ | बागायत | ०.०३ |
| ३१ | रामचंद्र दिपक काळे | ९१/३ | बागायत | ०.०३ |
| ३२ | श्रीधर नन्हापा काळे व इतर २ | ९० | बागायत | ०.०३ |
| ३३ | पितांबर किसन ननवरे व इतर ३ | ८९ | बागायत | ०.११ |
| ३४ | परमेश्वर मोहन काळे व इतर १ | ८८ | बागायत | ०.१२ |
| ३५ | प्रमोद चांगदेव काळे व इतर १ | ८७ | बागायत | ०.०२ |
| | | | **एकूण क्षेत्र** | **१.९०** |

सही/- **(अनिल कारंडे)**
उपजिल्हाधिकारी
भूसंपादन क्र.३, सोलापूर

जिमाका/सो/जाहि/११३/२०२२


CMYK



## मतदानाचा हक्क रद्द केल्याने युवासेनेकडून निषेध

**सुराज्य/अकलूज** : शिंदे, फडणवीस यांचे सरकार स्थापन झाल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुका प्रक्रिया सुरू झाली आहे त्यामध्ये ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे संचालक, व्यापारी, हमाल, तोलार यांनाच मतदानाचा अधिकार दिला आहे तर खातेदार आणि शेतकरी यांना मतदानापासून वंचित ठेवले आहे. तरी कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देण्यात यावा या मागणीसाठी युवासेना अकलूज शहरप्रमुख शेखरभैय्या खिलारे यांनी प्रांतकार्यालय या ठिकाणी निवेदन दिले आहे त्यावेळी बच्चन साठे, शिवराम गायकवाड, अतुल माने, सचिन गायकवाड उपस्थित होते.



## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात एस.व्ही.सी.एस. प्रथम

**सुराज्य/सोलापूर** : आदर्श प्राथमिक शाळा सोरेगाव येथे संपन्न झालेल्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात एस व्ही सी एस हायस्कूल एम आय डी सी ची विद्यार्थिनी श्रावणी आवताडे इ ८ वी तु ड हिने तयार केलेल्या फळ तोडणी यंत्र या उपकरणास तालुक्यातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. तिला विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक गिरमल बुगडे पर्यवेक्षक विलास म्हमाणे यांनी अभिनंदन केले. संस्थेचे संचालक शिवानंद पाटील यांच्या हस्ते सत्कार करून जिल्हा स्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आले.

## तिऱ्हे ते पाथरी रस्ता दुरुस्ती करा-बंडगर

**सुराज्य/उत्तर सोलापूर** : उत्तर सोलापूर तालुक्यातील तिऱ्हे ते पाथरी रस्ता पूर्णपणे खराब झाला असून सर्व सामान्यांना त्रास होत आहे. रस्ता त्वरित दुरुस्ती करावा असी मागणी पाथरीचे उपसरपंच श्रीमंत बंडगर यांनी कार्यकारी अभियंता क्रमांक १ यांना निवेदनाद्वारे यांना केली आहे. यावेळी संजय वाघमोडे, चंद्रकांत मसलखांब, प्रकाश गुरव, दिगंबर बंडगर उपस्थित होते. निवेदनात प्र. जि. मा ३७ या रस्त्याच्या तिऱ्हे ते पाथरी रस्ता पुर्ण खराब झाला आहे. ठेकेदाराने दुरुस्तीचे काम निकृष्टपणे केल्याने महिनाभरातच रस्त्यावर पाणी साचत आहे. मोठमोठे खड्डे पडले आहेत. काम अंदाजपत्रकाप्रमाणे केलेले नसुन डांबर व खडी कमी प्रमाणात वापर केल्याने काम चांगले झालेले नाही. चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी यावेळी पाथरीतील ग्रामस्थ उपस्थित होते.





## अकलूज शहर कार्याध्यक्षपदी कबीर मुलाणी यांची निवड

**सुराज्य/अकलूज** : राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार प्राध्यापक जोगेंद्र कवाडे सर राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदिपभाई कवाडे राज्य उपाध्यक्ष राजाभाऊ इंगळे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या अकलूज शहर युवक कार्याध्यक्षपदी कबीर मुलाणी यांची निवड राज्य कार्यकारिणी सदस्य व सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले यांच्या हस्ते निवडीचे पत्र देऊन करण्यात आली.

कबीर मुलाणी यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राज्य कार्यकारणी सदस्य व सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले यांनी हार फेटा बांधून सत्कार करून शुभेच्छा दिल्या व वाढदिवसाची भेट म्हणून अकलूज शहर कार्याध्यक्षपदी निवड करून निवडीचे पत्र दिले निवडीला उत्तर देताना कबीर मुलाणी म्हणाले की जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले यांनी माझ्यावर दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडणार असून पीपल्स रिपब्लिकन पार्टीची ताकद अकलूज शहर व परिसरात वाढवणार असल्याचे सांगितले. यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे हेमंत कांबळे शिवम गायकवाड पांडुरंग चव्हाण विश्वास उगाडे शिवाजी खडतरे अशोक कोळी यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## स.मा.वि. प्राथमिक शाळेत फॅन्सी ड्रेस स्पर्धा उत्साहात

**सुराज्य/माळीनगर** :सदाशिवराव माने विद्यालय प्राथमिक विभाग अकलूज प्रशालेत फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रशालेच्या मुख्याध्यापिका नूरजहाँ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली छोटा गट व मोठा गट यांचे वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थांनी विविध सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य, समाजसेवक, महापुरूष आदी आर्कषक वेषभूषा साकारल्या होत्या. त्या वेषभूषेत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातुन सामाजिक संदेश मांडले. त्यानंतर प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण वंदना पवार, रेश्मा चिंचकर, सोफिया कोरबू, सीमा पाटोळे यांनी केले.

# भोसरे पंचक्रोशीत नेत्यांचा राजकीय वर्चस्ववाद

## आगामी निवडणूक प्रत्येक गटासाठी प्रतिष्ठेची

**सुराज्य/कुर्डूवाडी**






कुठल्याही एका गटाला पूर्ण गावावरती एक हाती सत्ता आजपर्यंत आणता आलेली नाही. निवडून आल्यानंतर एखाद्या गटाबरोबर किती केल्याशिवाय गावावर वर्चस्व राखता येतच नाही हा देखील इतिहास आहे. भोसरे गावावरती सत्ता काबीज करणे म्हणजे एखाद्या जिल्हा परिषदेवरती झेंडा रोवल्याप्रमाणे आहे. कारण भोसरे एकमेव ग्रामपंचायत आहे की जिथे महसूल खूप मोठ्या प्रमाणात मिळतो तालुक्यातलं महत्त्वाचं दळणवळणाचं गाव म्हणून ओळखलं जातं आणि कुर्डूवाडी ची बाजारपेठ ही पन्नास टक्के भोसरे गाव अवलंबून आहे त्यामुळे ज्याची राजकीय सत्ता त्याचं आर्थिक गणित चांगलं हे समीकरण जुळवण्यासाठी भोसरी पंचक्रोशीतील प्रत्येक गटाला येणाऱ्या काळात सत्ता संघर्ष करावाच लागेल.

माढा तालुक्यातील पण करमाळा विधानसभेला जोडलेल्या राजकीय दृष्टीने भोसरे गावचा तसा राजकारणात मोठा दबदबा. गाव तसं खूप चांगलं. गावात कितीही एकमेकांचे कट्टर वैर असलं तरी गाव एका मिस कॉल वर एकत्र होणार. याच भोसरे गावची राजकीय चळवळ ही तालुक्याच्या राजकारणाला वळण देणारी ठरली आहे. गावात बलाढ्य मोठे सावकार, मोठे नोकरदार... बलाढ्य मोठे असे बागायतदार... आणि गुंठामंत्री यांची संख्या काय कमी नाही... बक्कळ पैसा आणि मोठा जनसंपर्क या जीवावर गावात नेत्यांचीही कमी नाही.

एका गावात राजकीय दृष्ट्या जिल्हा परिषद व पंचायत समिती ही दोन तिकिटे देता येत नाहीत पण भोसरे हे एकमेव तालुक्यातील गाव आहे जिथे पंचायत समिती व जिल्हा परिषद दोन्ही तिकिटे एकाच गावात द्यावी लागतात, गावच्या पंचक्रोशीत आता राजकीय वर्चस्व राखण्यासाठी जुन्या आणि नवख्या पुढाऱ्यांचा सत्तासंघर्ष हा सुरु झाला आहे.

सुरेश चंद्रकांत बागल हे एकेकाळी हमाल म्हणून परिचयाचे होते. गोरगरिबांच्या लेकरांचा आधारवड म्हणत. . . हाजारो हातांना काम देणारं नेतृत्वं आज गावच्या पंचक्रोशीनं पंचायत समिती सदस्य, माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य, व माढा तालुका हमाल पंचायत समितीचे अध्यक्ष या पदावर नेऊन बसवले. आमदार संजय मामा शिंदे गटाचे दमदार वजन असलेला नेता म्हणून त्यांची ओळख. . . आजूबाजूच्या गावात ही त्यांचा शब्द खाली पडू दिला जात नाही.

गावातीलच शिवसेनेचा एक चेहरा सचिन रामचंद्र बागल युवा सेनेचे जिल्हाप्रमुख हे देखील मागिल पाच वर्षाच्या राजकारणात जिल्ह्याच्या नेत्याला दखल घेण्याजोगे झाले आहेत. गावात अनेक जुन्या नेत्यांना धोबीपछाड करित गावावर सत्ता काबिज करण्यात यश मिळाले पण अद्याप सचिन बागल यांना एकहाती सत्ता आणता आली नाही. तर दुसऱ्या बाजूला आमदार संजय मामा शिंदे गटाचे कधीकाळी एकेकाळी स्व. नामदेव बागल नावाचा गट पंचक्रोशी वरती राज्य करीत होता पण नवख्या पुढाऱ्यासमोर आज भोसरी विविध सहकारी सोसायटीच्या व्हाईस चेअरमन पदावर त्यांना समाधान मानावे लागले. नामदेव बागल यांचे सुपुत्र अनंतराव नामदेव बागल यांचाही गट राजकीय मैदानात संघर्ष करीत आहे. भोसरे ग्रामपंचायत वर सरपंच म्हणून आपला किता गिरवणारे माजी सरपंच संदिपान मुरलीधर बागल यांचाही एक गट राजकीय सत्तेची समीकरणे आखत आहे. सध्याच्या घडीला संदिपान बागल व गणेश बागल हे दोन्ही गट एकत्रित सक्रिय राजकारणात आहेत. गणेश बागल यांना राजकीय संघर्षाबरोबर गृह-संघर्षालाही सामोरे जावे लागेल असे दिसत आहे.

पूर्वी भोसरे ग्रामपंचायत मध्ये दोनच गट पाहायला मिळत होते संदिपान बागल -अनंतराव बागल व सुरेश बागल पण हल्लीच्या राजकारणात तरुणांची संख्या वाढत आहे आणि जुन्या बुडांना बाजूला करीत नवख्यांची मांदियाळी पुढे येत आहे. अँड. धनाजी बागल यांना जिल्हाप्रमुख सचिन बागल यांनी लॉटरीचे तिकिट दिले आणि सरपंच केले. राजकारणात कधी कुणाच्या घरात दिवाळी होईल हे सांगता येत नाही त्याच पध्दतीने अँड धनाजी बागल यांच्या घरात सहा महिन्याच्या आत सोसायटी चेअरमन व सरपंच ही दोन प्रमुख पद आली आणि राजकारणाच्या पटलावर धनाजी बागल हे नाव पुढे येऊ लागले. विरोधकांसोबत जाण्यापेक्षा नवख्या गटाबरोबर जाण्यात अनंतराव बागल गटाने धन्यता मानली. या सर्व काही घडामोडी होत असताना वेट अँड वॉच ची भूमिका पंचायत समिती सदस्य सुरेश बागल यांनी घेतली. कुणाला कोणते डाव टाकायचे आहेत ते टाकू द्या वेळेला आपण आपली सोंगटी टाकूया असे म्हणत अद्याप तरी राजकारणाचे पत्ते त्यांनी ओपन केले नाहीत. हेच सुरेश बागल यांच्या राजकारणाची खरी ओळख आहे. सध्याच्या घडीला भोसरे पंचक्रोशी तीन गट सक्रिय आहेत एक सुरेश बागल दुसरा संदिपान व गणेश बागल तर तिसरा धनाजी बागल यांना सरपंच पदावर बसवलेले सचिन बागल यांचा गट आहे.

## श्री शिवचलेश्वर पालखीनिम्मीत कार्यक्रम

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील ग्रामदैवत श्री शिवचलेश्वर पालखी महोत्सवानिम्मीत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामदैवत श्री शिवचलेश्वर पालखी महोत्सव दर वर्षाप्रमाणे यंदाही उत्तरा नक्षत्राच्या पहिल्या गुरुवारी दि. १५ सप्टेंबर गुरुवार रोजी पालखी महोत्सव होणार असुन या पालखी महोत्सवानिम्मीत मंदिरात श्रावण महिन्यापासुन रोज पहाटे श्री स रुद्रभिषेक तसेच पानपुजा धार्मिक कार्यक्रमाबरोबरच दि. १ सप्टेंबर पासुन मंदिरात रोज सायकाळी ८ वाजता श्री शिवचलेश्वर महात्मे आधारीत श्री वे. प. संगय्या शास्त्री हिरेमठ यांच्या अमृत वाणीने पुराण प्रवचन चालु आहे मंगळवार दिनांक ०६ रोजी अग्नी महोत्सव उत्साहात पार पडले आहे.

रोजी दि. ११ सप्टेंबर रविवार रोजी मंदिरात हेडगी जत्रा होणार आहे तसेच दि. १५ सप्टेंबर गुरवार रोजी सकाळी ९ वाजता मंदिरातुन पालखी मिरणुकीला सुरुवात होऊन शहराच्या प्रमुख मार्गाने मिरवणुक निघणार असुन या सोहळ्यात शहरातील विविध चौकातील तरुण मंडळाचे कार्यकर्ते लेझीम टिपरी ढोळळ भजन संघ, नृत्य संघ सहभागी होणार आहेत

## सिध्देश्वर एक्सप्रेस, मेल यांचा थांबा पूर्ववत करावा

**सुराज्य/मोहोळ**

मोहोळ रेल्वे स्थानकावरती सिध्देश्वर एक्सप्रेस मेल गाडी यांचा थांबा पूर्ववत करावा व त्याचबरोबर नव्याने हुतात्मा एक्सप्रेस व कन्याकुमारी पुणे एक्सप्रेस या गाड्या सुरू करान्यात या प्रमुख मागण्या घेऊन आज दिल्ली येथील ऐतिहासिक जंतर-मंतर या ठिकाणी मोहोळचे प्रथम नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश चिटणीस रमेश बारसकर यांनी धरणे आंदोलन केले.



काही दिवसापूर्वी रमेश बारसकर यांनी मोहोळ रेल्वे स्टेशन येथे रेल्वे रोकोचे आंदोलन केले होते. मात्र सोलापूर विभागाचे डीआरएम गुप्ता यांच्या आश्वासनानंतर रेल रोको आंदोलन स्थगित करण्यात आले होते. परंतु पुढे या विषयावर कोणताच तोडगा निघत नसल्यामुळे व स्थानिक रेल्वे प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याने सोमवार १२ सप्टेंबर रोजी रमेश बारसकर यांनी चेअरमन साहेब रेल्वे बोर्ड, रेल्वे भवन दिल्ली यांच्या विरोधात धरणे आंदोलन केले. यावेळी जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या बारसकर यांच्या धरणे आंदोलनाची दिल्ली पोलीस व रेल्वे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन त्यांना चर्चेसाठी रेल्वे भवन येथे घेऊन गेले. यावेळी मागण्यांचे निवेदन स्वीकारण्यासाठी व चर्चा करण्यासाठी रेल्वे बोर्डाचे ईडीआयआर पीटर गॅब्रियल, डायरेक्टर ऑफ रेल्वे बोर्ड राकेश सिन्हा, विवेक सिन्हा डेप्युटी डायरेक्टर कोचिंग, अमितकुमार शर्मा इत्यादी अधिकारी रेल्वे बोर्डाच्या वतीने उपस्थित होते. प्रमुख मागण्या वरती चर्चा केल्यानंतर सिध्देश्वर एक्सप्रेस थांबवण्याकरता रेल्वे बोर्डाच्या मीटिंगमध्ये सदरचा विषय तातडीने घेऊन प्राधान्याने प्रयत्न केले जातील व इतर गाड्यांकरिता संबंधित विभागाकडून आढावा घेऊन त्यावरती कार्यवाही करू असे आश्वासन दिल्यानंतरच सदरचे आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले आहे असे रमेश बारसकर यांनी सांगितले.

## शक्तीदेवी नवरात्र महोत्सवाच्या अध्यक्षपदी विश्राम पटेल

**सुराज्य/अक्कलकोट** : संजय नगर खासबाग गल्ली हसापूर रोड, अक्कलकोट येथील शक्तीदेवी नवरात्र महोत्सवाच्या अध्यक्षपदी विश्राम (शेठ) पटेल यांची तर उपाध्यक्षपदी राजू जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली.



शक्तीदेवी नवरात्र मंडळाच्या २५ व्या रौप्य महोत्सवच्या नूतन पदाधिकारी निवडी संदर्भात शक्ती देवी ट्रस्टचे अध्यक्ष शरणू पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सन २०२२-२३सालाकरिता ही निवड करण्यात आली. यावेळी विशाल ऊर्फ मुन्ना राठोड, अरुण लोणारी, सुनिल सिध्दे, शिवराज बिराजदार, प्रकाश कोळी, वसंत बंडगर, संतोष पराणे, वैजनाथ मुकडे, देवीदास गोबरे, सुर्यकांत बाचके, मारुती टोणपे, बाजीराव जाधव, बाबा सुरवसे, रविंद्र भंडारे, काशिनाथ धुमाळ, अप्पा शिंदे, सुरेश वाटे, काशीम नाईकवाडी, मोहन शिंदे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विश्राम (शेठ) पटेल यांची शक्ती देवी नवरात्र महोत्सवाच्या नूतन अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## तीर्थक्षेत्र परिसरात व्यसनमुक्त युवक संघटनेकडून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे मोठे कार्य

**सुराज्य/वेळापूर**

तीर्थक्षेत्र म्हटलं की अनेक ठिकाणे आपल्या नजरेसमोर उभी राहतात त्यामध्ये वारकरी सांप्रदाय म्हटलं की, आळंदी व पंढरपूर या व्यतिरिक्त कोणतंही तीर्थक्षेत्र नजरेसमोर येणार नाही व्यसनमुक्त युवक संघ, महाराष्ट्र ही संघटना समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम करते या संघटनेच्या माध्यमातून कार्य करीत असलेल्या अनेक कार्यकर्त्यांच्या वेगवेगळ्या संकल्पना संघटनेस नेहमी उभारी देण्याचे काम करतात अगदी आपत्ती व्यवस्थापन असेल, व्यसनमुक्ती असेल किंवा, समाजहिताचे व पर्यावरणाचे अनेक उपक्रम या संघटनेतील कार्यकर्ते खिशातील



स्वतःचे पैसे वापरून राबवित असतात

गेली सुमारे आठ ते दहा वर्षा पासून देहू, आळंदी व भंडारा डोंगर या ठिकाणी व्यसनमुक्त युवक संघटनेच्या माध्यमातून वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धनाचे मोठे काम चालू असून आज अनेक वृक्ष या ठिकाणी येणाऱ्या वैष्णवांना सावली देण्याचं काम करीत आहेत बऱ्याच संस्था किंवा संघटना वृक्षारोपन करतात परंतु लावलेल्या वृक्षांचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी न पार पाडता त्याकडे दुर्लक्षित पणा करण्याचे काम करतात यास अपवाद या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लावलेलं प्रत्येक झाडं हे आलंच पाहिजे ही इच्छाशक्ती बाळगून त्या वृक्षांचे जतन केले आहे. सदगुरु जोग महाराज यांच्या जन्ममोत्सवाच्या निमित्ताने आळंदी येथील इंद्रायणी नदीचा घाट स्वच्छ करून व जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या प्रांगणात १५३ पर्यावरण पूरक औषधी व फळझाडे व्यसनमुक्त युवक संघटनेचे पुणे जिल्हा उपअध्यक्ष श्री ह भ प संदीप महाराज लोहर यांच्या संकल्पनेतून लावण्यात आली.

यावेळी शांतीब्रम्ह कुरेकर बाबा व संस्थेचे अध्यापक व विद्यार्थी तसेच आळंदी देवस्थान चे अध्यक्ष अँड. टिळक, डॉ वाघमारे, शिंदे, माजी आरोग्य अधिकारी तावरे साहेब, राठोड साहेब, उपस्थित होते.

## भांड याची बेसबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी

**सुराज्य/अक्कलकोट** : ३५ वी सीनिअर राष्ट्रीय बेसबॉल अजिंक्यपद स्पर्धा २०२२ जालंदर, पंजाब येथे पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने अंतिम सामन्यात पंजाबचा पराभव करत सुवर्ण पदक मिळविले. यात महाराष्ट्रने पंजाबचा ३ - २ होमरनने पराभव केला. सुवर्ण पदक विजेत्या संघात सोलापूर शहरातील अक्षय हवळेचा आणि अक्कलकोट तालुक्यातील सीताराम भांड ह्या खेळाडूंचा समावेश होता. भांड हा अक्कलकोट तालुक्यातील मुंढेवाडी गावचा आहे. राष्ट्रीय पातळीवर भांड यांनी मिळवलेल्या यशाबद्दल अक्कलकोट तालुक्यातून सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल आमदार सचिन कल्याणशेट्टी, युवा नेते बसवराज बाणेगाव आदी नेते मंडळींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## ज्याचे हिंदी भाषेवर प्रभुत्व तो जगावर राज्य करेल : प्रा. कदम

### भिसे महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात

**सुराज्य/कुर्डूवाडी**

भाषेवर प्रभुत्व असणारा व्यक्ती जगाच्या स्पर्धेत कधीच मागे राहू शकत नाही, हिंदी अशी एकमेव भाषा आहे की जिथे रोजगाराच्या अनेक संधी आहेत, यामध्ये इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया, हिंदी कॉमेंट्री, अनुवादक, राजभाषा सहाय्यक, रेडिओ जॉकी, हिंदी ब्लॉग, हिंदी सॉफ्टवेअर, समाचार लेखन, पत्रकारिता, हिंदी प्राध्यापक, राज्य लोकसेवा आयोग, आयपीएस, संघ लोकसेवा आयोग, अशा अनेक विविध क्षेत्रावर ज्या व्यक्तींचं हिंदी भाषेवर प्रभुत्व आहे, ज्याला उत्तम हिंदी भाषा बोलता येते, लिहिता येते तो व्यक्ती अशा विविध क्षेत्रांमध्ये आपलं करिअर घडवू शकतो. ज्याचं हिंदी वरती प्रभुत्व तो जगावर राज्य करू शकतो असे प्रतिपादन माढा महाविद्यालयाचे डॉ. एन. बी. कदम यांनी केले. के एन भिसे महाविद्यालयात ते हिंदी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार विनायकराव पाटील उपस्थित होते. माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के एन भिसे आर्ट्स कॉमर्स व विनायकराव पाटील सायन्स कॉलेज विद्यानगर भोसरे येथे हिंदी विभागाच्या वतीने १४ सप्टेंबर हिंदी राजभाषा हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कला विभाग प्रथम द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. १४ सप्टेंबर हिंदी राजभाषा दिवस निमित्ताने हिंदी प्रश्नमंजुषा तसेच हिंदी निबंध स्पर्धा व हिंदी वक्तृत्व स्पर्धा हिंदी विभागाच्या वतीने आयोजित केल्या होत्या. यामध्ये विश्व भाषा की दिशा मे हिंदी, हिंदी दिन, हिंदी भाषा और रोजगार की संभावना अशा विविध विषयांवर परिसंवाद घडवून आणले.

## महिला डॉक्टरांनी वाचविले तृतीय पंथियाचे प्राण

**सुराज्य/अक्कलकोट**

हल्ली समाजामध्ये स्वार्थी भावना वाढत चालली आहे अशा परिस्थितीमध्ये काही संबंध असताना एखाद्या विषयी सहवेदना बाळगून प्राण वाचविण्याच्या घटना दुर्मिळच आहेत अशीच एक घटना अक्कलकोट मधील समर्थ नगरमध्ये घडली आहे. डॉ. शिवलीला माळी यांच्यामुळे एका तृतीय पंथीयाचे प्राण वाचले आहेत.



समर्थनगर परिसरामध्ये परवा रात्री एक तृतीयपंथी माणूस आपल्या बहिणीच्या सोबत जात होता. अचानक चक्कर येऊन तो बेशुध्द पडला त्याची भगिनी त्याला शुध्दीवर आणण्यासाठी प्रयत्न करत होती. लोक मदतीसाठी जमू लागले. त्याचवेळेस जेऊर आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. शिवलीला माळी या आपल्या भावासह तिथून चालल्या होत्या त्यांनी लगेच आपली गाडी थांबून त्या बेशुध्द व्यक्तीला तपासले व तिथेच रस्त्यावरती हार्ट पंपिंग केले. हार्ट पंपिंग केल्यानंतर त्या व्यक्तीमध्ये थोड्याशा संवेदना जागृत झाल्या. डॉ. शिवलीला यांनी त्वरित प्रथमोपचार करून त्या व्यक्तीस ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे हलविण्यास सांगितले. यावेळी मेजर नटूलाल जमादार यांनी आपल्या गाडीवरती बसवुन त्या व्यक्तीला ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. याचवेळी जयप्रकाश गुरव, जितेंद्र जाजू, अमोल स्वामी, नरेगल आदींनी त्या व्यक्तीस प्रथम उपचारासाठी मदत केली व त्वरित पुढील कार्यवाहीसाठी ग्रामीण रुग्णालय येथे हलविले. डॉ. शिवलीला यांनी अज्ञात व्यक्तीला रोडवरती तपासून प्रथमोपचार करून रुग्णालयात दूरध्वनीवरून सर्व पुढील सर्व व्यवस्था पाहिली. डॉ. माळी यांनी कोरोना काळातही मोठे योगदान दिले आहे. अज्ञात व्यक्तीसाठी कर्तव्य भावनेतून केलेले प्रथम उपचार यामुळे या व्यक्तीचे प्राण वाचले. याबद्दल समाजातून सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# वेदांता-फॉक्सकॉन प्रोजेक्ट गुजरातला गेलाच कसा ? : सामंत

सुराज्य/मुंबई

वेदांता-फॉक्सकॉन कंपनीचा सेमीकंडक्टर आणि डिस्पले फॅब्रिकेशनचा महाराष्ट्रातील प्रस्तावित प्रकल्प गुजरातमध्ये का गेला, यासंदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यासंदर्भात राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना विचारणा केली असता त्यांनी केवळ आपल्या सरकारचा बचाव केला. पण जेव्हा हा प्रकल्प गुजरातमध्ये का गेला, याचे कारण विचारले तेव्हा उदय सामंत यांनी, 'हा प्रश्न वेदांता समूहाच्या प्रमुखांनाच विचारायला पाहिजे', असे सांगत फारकाही बोलणे टाळले.



वेदांताचे प्रमुख अनिल अग्रवालच सांगू शकतील की, ते तोटा सहन करुन गुजरातला का गेले?, असे उदय सामंत यांनी म्हटले.

उदय सामंत हे बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकारपरिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारने सत्तेत येताच वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पासाठी वेगाने हालचाली केल्याचा दावा केला. राज्य सरकारने १५ जुलैला हाय पॉवर कमिटीची बैठक घेऊन वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पासाठी तब्बल ३९ हजार कोटींचे पॅकेज जाहीर केले. गुजरात, तेलंगणा आणि कर्नाटक या राज्यांपेक्षा महाराष्ट्राने वेदांता-फॉक्सकॉन ला दिलेले आर्थिक पॅकेज नक्कीच चांगले होते. आपली तळेगाव येथील जमीनही गुजरातच्या धोलेरापेक्षा चांगली होती. याशिवाय, तळेगावमधील इतर सुविधाही गुजरातपेक्षा सरस होत्या. तरीही वेदांता समूहाने या प्रकल्पासाठी गुजरातची निवड का केली, हे समजत नाही, असे उदय सामंत यांनी म्हटले. उदय सामंत यांच्या या अतिसावध भूमिकेमुळे आता आणखी काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. तर दुसरीकडे माजी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनीही पत्रकार परिषद घेऊनवेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पासाठी तळेगावची जागा निश्चित झाल्याचा दावा केला. गुजरातने वेदांता-फॉक्सकॉन कंपनीला महाराष्ट्रापेक्षा अधिक चांगलं पॅकेज दिलं का, असा प्रश्न यावेळी सुभाष देसाई यांना विचारण्यात आला. यावर सुभाष देसाई यांनी म्हटले की, माझ्या माहितीनुसार गुजरातने तशवरपींर ॠलेपप कंपनीला महाराष्ट्रापेक्षा १२ हजार कोटींनी कमीचे पॅकेज दिले आहे. तरीही हा प्रकल्प गुजरातमध्ये का गेला, याचा विचार व्हायला पाहिजे, असे सुभाष देसाई यांनी म्हटले.

### सेमीकंडक्टरची मोठी टंचाई

गेल्या वर्षी सेमीकंडक्टरची मोठी टंचाई देशात निर्माण झाली होती. याचा फार मोठा फटका वाहन उद्योगाला बसला होता. सेमीकंडक्टर चीन आणि तैवान येथून आयात केले जातात. या दोन्ही देशांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी देशात सेमीकंडक्टरचे उत्पादन होणं गरजेचं आहे. त्यासाठी केंद्र सरकारने आर्थिक सवलत योजना आणली होती. यामध्ये उत्पादनसंलग्न सवलत योजनाही (पीएलआय) लागू करण्यात आली होती. याचा फायदा घेऊन सेमीकंडक्टर उत्पादन करण्यासाठी वेदान्त-फॉक्सकॉन यांनी संयुक्त अर्ज केला होता.

### वेदांत-फॉक्सकॉनला महाराष्ट्राने काय दिले होते?

महाविकास आघाडी सरकारकडून वेदांत - फॉक्सकॉनला ३९ हजार कोटींची सवलत देण्यात आली होती. २० वर्षांसाठी रोज ८० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा, स्टँप ड्युटीमध्ये ५ टक्के सूट देण्यात आली होती. वीज दरात १० वर्षांसाठी साडेसात टक्के सूट, तळेगावमधील ४०० एकर जागा मोफत दिली होती. तसंच ७०० एकर जागा ७५ टक्के दराने दिली होती. १२०० मेगावॅटचा अखंडित पुरवठा २० वर्षांसाठी ३ रुपये प्रति युनिट दराने देण्यात आला होता. पाणीपट्टीत ३३७ कोटी रुपयांची सूट, घनकचरा प्रक्रियेवर ८१२ कोटींची सूट देण्यात आली होती.



## अतिवृष्टीग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

सुराज्य/दक्षिण सोलापूर : दक्षिण सोलापूर तालुक्यात मोठया प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे अतिवृष्टी झालेल्या भागातील पिकांचे पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी दक्षिण सोलापूर तालुका सरपंच संघटनेनी केली आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने शेतीत मोठया प्रमाणात पाणी थांबल्याने खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले आहे . मूग , उडीद , तूर , मटकी , बाजार , मका यासारख्या पिकांचे नुकसान झाले आहे . यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याने सामान्य शेतकरी कर्जबाजारी बनला आहेत . यामुळे रब्बी हंगामातील पेरणीवर परिणाम होऊन पेरणी क्षेत्र घटण्याची शक्यता आहे . त्यामुळे शासनाने नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी दक्षिण सोलापूर तालुका सरपंच संघटनेनी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे . यावेळी नांदणीचे सरपंच शिवानंद बंडे , लवंगीचे सरपंच संगमेश बगले पाटील , येळेगावचे सरपंच संजयकुमार लोणारी , बोळकवठाचे सरपंच रमिज नदाफ , औरादचे सरपंच शांतकुमार गडदे , वांगीचे सरपंच शामराव हांडे , सरपंच संगप्पा कोळी , सादेपूरचे उपसरपंच अप्पासाहेब चितापूरे , मद्रेचे उपसरपंच मुजीब शेख , फताडेवाडीचे उपसरपंच हरीश्चंद्र राठोड आदि उपस्थित होते .

## 'विठ्ठलराव'चा अंतिम हप्ता बँक खात्यावर वर्ग

सुराज्य/टेंभुर्णी : विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याने ऊस गाळप हंगाम २०२१-२२ मध्ये युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ येथे गाळप केलेल्या ऊसासाठी प्र.मे.टन रू.२५४/- प्रमाणे अंतिम हप्ता ऊस पुरवठादार शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करणेत आला असल्याची माहीती कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली . गळीत हंगाम सन २०२१-२२ मध्ये विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर येथे २४ लाख %८ हजार ९२२ मे.टन ऊसाचे गाळप केलेली आहे. तसेच युनिट नं.२ करकंब येथे ६ लाख ५५ हजार ५६४ मे.टन ऊसाचे गाळप केलेली आहे. दोन्ही युनिटचे मिळून ३१ लाख ३४ हजार मे.टनाचे देशामध्ये विक्रमी गाळप केलेले आहे. ऊस गाळप हंगाम २०२१-२२ साठी युनिट नं. १ व २ कडे गाळप झालेल्या ऊसास यापुर्वी प्र.मे.टन रू.२१००/-प्रमाणे पहिला डव्हान्स हप्ता, दुसरा हप्ता २५०/- प्रमाणे असे एकुण २३५० /- अदा करण्यात आलेला आहे. ऊस पुरवठादार शेतक-यांना दिवाळी सणासाठी अंतिम हप्ता २५४ /- प्रमाणे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला आहे, असे एकुण प्रति टन २६०४ /- प्रमाणे पेमेंट ऊस पुरवठादारांना होत आहे. युनिट नं.१ व २ कडे गाळप झालेल्या ऊसाचे अंतिम हप्त्या पोटी कारखान्याने %९ कोटी ६१ लाख ५९ हजार रूपये बँकेत वर्ग केलेली आहे. ऊस गाळप हंगाम २०२२-२३ हंगामामध्ये दोन्ही युनिटकडे गाळपक्षमतेएवढा ऊसाचा पुरवठा होण्साठी ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा करार करणेची कार्यवाही सुरू आहे. तसेच ऊस तोडणी वाहतूक कंत्राटदारांना पहिला व दुसरा डव्हान्स हप्ता अदा करण्यात आलेला असून अंतिम हप्ता लवकरच अदा करणार आहे अशी माहीती कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ.बबनराव शिंदे यांनी दिली.

## राज्यात २ ऑक्टोबरपासून मोफत आरोग्यसेवा

सुराज्य/मुंबई

सामान्य मुंबईकरांना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना आणि पॉलिक्लिनिकच्या माध्यमातून २ ऑक्टोबरपासून मोफत आरोग्य सेवा मिळणार आहे. मुंबईत सुमारे २२७ आरोग्य केंद्रे सुरू करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात ५० आरोग्य केंद्रांचा शुभारंभ होणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे दिली.

आरोग्य केंद्रांद्वारे सुमारे १३९ वैद्यकीय चाचण्या मोफत केल्या जाणार आहेत. सह्याद्री अतिथीगृह येथे यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. झोपडपट्टी भागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी मोबाइल मेडिकल युनिटची संख्या वाढवावी, तसेच मॅमोग्राफीसाठीदेखील मोबाइल व्हॅन सुरू कराव्यात, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. मुंबई महापालिकेच्या माध्यमातून हे क्लिनिक आणि पॉलिक्लिनिक चालविण्यात येणार आहे. सध्या ५० ठिकाणी या क्लिनिकचे काम पूर्ण झाले असून शहरातील पूर्व आणि पश्चिम उपनगरांत २२७ क्लिनिक उभारण्यात येणार आहेत. त्यामध्ये ३४ पॉलिक्लिनिक असणार आहेत. त्याद्वारे विशेषज्ञांची सेवा मिळणार आहे.

पोर्टाकॅबिन आणि पक्के बांधकाम अशा दोन स्वरूपात हे



क्लिनिक चालविण्यात येणार आहे. साधारण २५ ते ३० हजार लोकसंख्येसाठी एक याप्रमाणे हे क्लिनिक सुरू करण्यात येईल. सकाळी सात ते दोन, दुपारी तीन ते रात्री दहा अशी रुग्णांच्या सोयींनुसार दोन सत्रांत या दवाखान्याची वेळ असेल. या दवाखान्यात एक एमबीबीएस डॉक्टर, परिचारिका, औषधनिर्माता आणि बहुउद्देशीय कामगार असे मनुष्यबळ असेल. पॉलिक्लिनिक महापालिकेच्या उपलब्ध दवाखान्यात अडीच ते तीन लाख लोकसंख्येसाठी असेल. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रुग्णांची नोंदणी करण्यात आहे. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांनी सादरीकरण केले.

## चांदणी चौकातील पूल पाडणार

सुराज्य/पुणे : पुण्यात सध्या पुणे-मुंबई हायवे वर चांदणी चौक ब्रिजचे काम चालू असल्यामुळे पुणेकरांना प्रचंड अशा वाहतूक कोंडीवलास सामना करावा लागतो आहे.

पुणे-मुंबई हायवेला लागणार रस्ता म्हणजे चांदणी चौक होय. चांदणी चौकातील ब्रिज पडल्यानंतर ती वाहतूक कोंडी कमी होणार आहे आणि ह्या ब्रिज पाण्याबाबत सध्या पुण्यामध्ये खूप चर्चा आहे. ज्या कंपनीने ट्विन टॉवर दिल्लीतील नोएडा येथील टॉवर अवघ्या काही मिनिटांमध्ये पाडला तेच कंपनीच्या तंत्रज्ञानाचा वापर करून आता हा ब्रिज काही सेकंदामध्ये पाडण्यात येणार आहे. म्हणून काही क्षणातच पूल जमीन दोस्त होणार आहे.

## बच्चू कडू यांच्या विरोधात गुन्हा दाखल

सुराज्य/मुंबई : शिंदे गटाचे अपक्ष आमदार बच्चू कडू यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजकीय आंदोलन केल्याप्रकरणी गिरगाव कोर्टाने बच्चू कडू यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.



अकोल्याचे माजी पालकमंत्री बच्चू कडू यांनी विविध राजकीय आंदोलनातील प्रकरणात जामीन अर्ज दाखल केला होता. आज गिरगाव न्यायालयाने तो फेटाळून लावल्याने बच्चू कडू यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर मतदार संघाचे आमदार व महाविकास आघाडी सरकारमधील माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

आमदार बच्चू कडू यांचा जामीन अर्द गिरगाव न्यायालयाने फेटाळून लावला आहे. न्यायलयाने बच्चू कडू यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. राजकीय आंदोलनाप्रकरणी कडू यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यायालयाने कडू यांच्याविरोधात अजामीनापात्र वॉरंट बजावला होता. बच्चू कडू आज न्यायालयासमोर हजर झाले असता त्यांनी जामिनासाठी अर्ज केला. हा अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. जामीन अर्ज फेटाळत बच्चू कडू यांना न्यायालयीन कोठडी सुनावल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं आहे.

# 'लंपी'मुळे पुण्यात ५६ जनावरांचा मृत्यू

सुराज्य/पुणे

राज्यात लंपी चर्मरोगाच्या आजाराने ५६ जनावरांचा मृत्यू झाला आहे, तर तीन हजार ३५ जनावरे बाधित झाल्याची माहिती समोर आली आहे. या संदर्भात राज्याच्या पशुसंवर्धन विभागाकडून उपाययोजना सुरू असून, नागरिकांनी घाबरून जाऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यात जळगाव, नगर, धुळे, अकोला, पुणे, लातूर, औरंगाबाद, बीड, सातारा, बुलडाणा, अमरावती, उस्मानाबाद, कोल्हापूर, सांगली, यवतमाळ, परभणी, सोलापूर, वाशिम, नाशिक, जालना, पालघर, ठाणे अशा २२ जिल्ह्यांमध्ये लंपी आजाराची लागण झाली आहे. या जिल्ह्यातील एकूण ३९६ गावांमध्ये लंपी चर्मरोगाचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. जळगाव जिल्ह्यात २३, नगरमध्ये १७, अकोला, बुलढाणा, अमरावती जिल्ह्यांत प्रत्येकी तीन, धुळे, सातारा, वाशिम जिल्ह्यांत प्रत्येकी एक, पुणे जिल्ह्यात चार अशा ५६ बाधित पशुधनाचा मृत्यू झाला आहे. त्याशिवाय २२ जिल्ह्यांमध्ये ३०३५ जनावरांना बाधा झाली आहे. त्यापैकी १६७४ पशुधन उपचाराने बरे झाले आहेत,' अशी माहिती राज्याचे पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सिंह म्हणाले, पशुसंवर्धन विभागाने सुरुवातीपासूनच



आवश्यक ती खबरदारी घेतल्यामुळे महाराष्ट्रातील लंपी रोगामुळे मृत्यूदराचे प्रमाण रोखण्यात यश आले आहे. बाधित क्षेत्राच्या पाच किलोमीटर परिघातील २१५३ गावातील एकूण पाच लाख ५४ हजार ८८९ पशुधनास लसीकरण करण्यात आले आहे. बाधित गावांतील एकूण ३०३५ बाधित पशुधनापैकी एकूण १,५२० पशुधन उपचाराने बरे झाले आहे. उर्वरीत बाधित पशुधनावर उपचार सुरू आहेत.' लंपी रोगाच्या नियंत्रणासाठी राज्यात १० लाख लशी उपलब्ध झाल्या आहेत. त्यानुसार बाधित गावांच्या पाच किलोमीटर क्षेत्रात लसीकरण करण्यात येत आहे. खासगी पशुधन पर्यवेक्षकांच्या सहकार्यातून लसीकरण मोहीम घ्यावी.

### 'लंपी'चा मानवी आरोग्याला धोका नाही

राज्यात लंपी चर्म रोगाचा झपाट्याने प्रसार होत आहे. हा आजार केवळ गाई तसेच बैलांना होत असून त्याचा मानवी आरोग्याला कोणताही धोका होत नाही. तसेच दूध हे मानवी आरोग्यासाठी लाभदायक आहे. त्यामुळे समाज माध्यमात अफवा पसरविली जात असल्यास त्याबाबत कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताह सिंह यांनी दिला. या आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये यासाठी अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. हा रोग माशा, डास, गोचिड किटकांमार्फत पसरत असल्याने औषध फवारणी करण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. संसर्गजन्य आजार असला तरी तो त्वरीत उपचार सुरू केल्यास बरा होतो. रोगाने पशुधन दगावण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे पशुपालकांनी घाबरून जाऊ नये. तसेच मदतीसाठी पशुसंवर्धन विभागाचा टोल फ्री क्र.१८००-२३३०-४१८ अथवा राज्यस्तरीय कॉल सेंटर मधील पशुसेवेचा टोल फ्री क्र.१९६२ तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन केले.

## शॉक बसून एकाचा मृत्यू

सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट शहरातील विजय चौक रस्त्यावरील एम एस ई बी च्या उघड्या डीपीचा वीजेचा धक्का बसून ४० वर्षीय मजुराचा मृत्यू झाला. सिद्धाराम सोनकांबळे (वय ४०,रा. निमगांव ) असे मयताचे नांव आहे. ही घटना मंगळवारी दुपारी घडली.

सिद्धाराम सोनकांबळे हा रस्त्याने जात असताना रस्त्यावर असलेल्या उघड्या डी पी चा जीवघेणा शॉक बसला आणि यात तो गंभीर जख्मी होऊन मरण पावला. अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात उपचार करून सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे नागरिक भयभीत झाले. चिटकलेल्या सोनकांबळे याला ओढून काढण्यासाठी प्रयत्न केले. अथक परिश्रमानंतर थेट वीज कनेक्शन बंद करून त्याला ओढून काढले. परंतु तोपर्यंत जबरदस्त शॉक बसल्याने मृत्यू झाला. बाजूच्या व्यापारी व नागरिकांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु परिस्थिती गंभीर असल्यामुळे सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचार सुरू असताना गतप्राण झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

# सोलापुरातील प्रश्नांवर निर्णय होणे आवश्यक

सोलापूर शहर हे महाराष्ट्रामध्ये औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. परंतु सध्या सदर शहरामध्ये अनेक समस्या व प्रश्न अनंत काळापासून निर्माण झाले आहेत. यावर निर्णय होणे आवश्यक आहे, आम्ही ते खालील प्रमाणे आपणासमोर मांडत आहोत.

१) उजनी धरणापासून जी दुहेरी जलवाहिनी करण्यात येणार आहे याच्या प्रगती व काम कधी सुरू होणार याबाबत सविस्तर माहिती कृपया द्यावी.

२) सोलापूर शहराबाहेरून जाणारे बाह्यवळण रस्ता उदा. सीएनएस हॉस्पिटल ते सोरेगाव रस्ता व इतर बाह्यवळण रस्त्याबाबतीत आपली भूमिका विषद करणे आवश्यक आहे. कारण शहरात प्रचंड वाहतूक येत आहे.

३) सोलापूर शहरातील उड्डाणपूल सुरू करण्याबाबत आपले नियोजन काय व कसे आहे.

४) सोलापूर शहरातील व हद्दवाढ भागातील जनतेला नागरी सुविधा मिळणे उदा प्रसाधनगृह, मैदान, बागृवगीचा, सगळे तलाव सुशोभीकरण, फुटपाथ, नवीन बसस्थानक, दिवाबत्ती, प्रत्येक लाईटच्या खांबावर रेडिअम रिफ्लेक्टर लावणे. कारण सदर खांबावर धडक देऊन मृत्यु होत आहेत. डिव्हायडर जवळील माती काढणे, झाडे या सर्व बाबत आपले नियोजन काय आहे.

५) सोलापुरातील परिवहन व्यवस्था कधी सुरू होणार याबाबत आपले नियोजन काय आहे. नागरिकांची फारच कुचंबणा होत आहे.

६) सोलापुरात दररोज पाणीपुरवठा कसा करावा याबाबत काय नियोजन केले आहे.

७) सोलापुरातील महत्त्वाचे व सर्व रस्ते हे खड्डेमय झाले आहेत. हे काम कधी व कसे करावे. आपले नियोजन तसेच नवीन रस्त्याचे कारपेट हे पावसाळ्यात करणे बंद करावे. पावसाळा संपल्यानंतर करणे आवश्यक आहे याबाबत आपले नियोजन.

८) सोलापुरातील सर्व रस्त्यांच्या कडेला व मधोमध प्रचंड अतिक्रमण झाले आहे, ते काढण्यासाठी आपले नियोजन.



९) सोलापुरातील सर्व मालमत्तांवर वाढीव कर कोणत्या आधारे वसूल केला आहे ही माहिती दिली जावी. सदर कर अन्यायकारक आहे. याऐवजी धनदांडग्याकडून प्रलंबित मालमत्ता करांची सक्तीने वसुली या बाबतीत आपले नियोजन.

१०) गुंठेवारीबाबत आपले नियोजन तसेच शहर व हद्दवाढ भागातील नियोजन, बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र, बांधकाम परवाना, वापर परवाना, टॅक्सेशन याबाबत आपले नियोजन.

११) रस्त्यावरील भटकी कुत्रे, जनावरे हे रस्ता अडवून बसतात याबाबत आपले नियोजन.

१२) सध्या सगळ्यात जास्त धूळ असलेले शहर आहे. सदर धूळ कमी करण्यासाठी आपले नियोजन.

१३) सोलापुरातील हद्दवाढ व जुळे सोलापूर येथील नागरिकांना येणाऱ्या अनंत समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी त्या भागात विकासाची व योजनाची कामे करण्यासाठी महापालिकेकडून आर्थिक पॅकेज मदत करणे. कारण महापालिकेकडे सगळ्यात जास्त करही होन हे दोन विभाग जमा करीत आहेत. पर्यायाने यांना फारच तुटकी रक्कम कामांसाठी देत आहे. याबाबत आपले नियोजन.

१४) सोलापूर विजापूर रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज तलावाजवळ रस्त्याची रुंदी अत्यंत कमी झाली आहे. ती तातडीने मोठी करुन पुलाचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

– **मिलिंद भोसले,** राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ

## शहरातून चार दुचाकीसह रिक्षा पळवली

सुराज्य/सोलापूर

दिवसेंदिवस दुचाकी चोरीच्या घटनेत वाढ होत असताना पाहायला मिळत आहे.शहरातून चार मोटरसायकलीसह ऑटो रिक्षा चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

पहिली घटना ही फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खान मस्जिद शेजारील मुरारजी पेठ येथे दि.३१ ऑगस्ट रोजी घडली.फिर्यादी दीपक लक्ष्मण पासलकर (वय-४२,रा.मु.पो.कोंडी) यांचे दुचाकी क्रमांक एम.एच.१३.डीपी.४७९२ हॅण्डल लॉक करून पार्क केली होती.त्यावेळी अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेली आहे. पासलकर यांनी फौजदार चावड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक भद्रशेट्टी हे करीत आहेत.

तर दुसरी घटना ही पुणे हायवे रोडवरील संकेत थोबडे नगर येथे दि.१० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.फिर्यादी कृष्णदास दशरथ खैरमोडे (वय-४०,रा.वसंती विहार,संकेत थोबडे नगर) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीए.४५९२ हि हँडल लॉक करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. खैरमोडे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक घुगे हे करीत आहेत.

तर तिसरी घटना ही सदर बाजार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सात रस्ता परिसरात दि.९ ते १० सप्टेंबर रोजी घडली.फिर्यादी प्रसाद तायप्पा सोनकांबळे (वय-२१),रा. गजानन नगर,होटगी रोड) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सीजी.९४५८ ही पार्क करून ठेवली होती. त्यावेळी अज्ञात चोरट्याने ही दुचाकी चोरून नेली आहे. सोनकांबळे यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोह.आटुळे हे करित आहे. तर चौथी घटना ही कंबर तलाव येथील गेट नंबर २ समोरील पार्किंगच्या मोकळया जागेत दि.९ ते १० सप्टेंबर रोजी घडली.फिर्यादी विलास दत्तात्रय साळुंखे (वय-५६,रा. राघवेंद्र टॉवर,नीलम नगर) यांची दुचाकी क्रमांक एम.एच.१३.एई.३५५६ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.साळुंखे यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोह. नदाफ हे करित आहेत. तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन मार्कंडेय नगर येथून पन्नास हजार रुपये किमतीची ऑटो रिक्षा क्रमांक एम.एच.१३. सीटी.३२६३ ही रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.हि घटना दि.११ ते १२ सप्टेंबर दरम्यान घडली.याप्रकरणी फिर्यादी मोहम्मद अ.कादर चांदा, (वय-५५, रा. मार्कंडे नगर, कुमठा नाका) यांनी चांदा यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटेविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक रुपनर हे करीत आहेत.

## 'पंढरी'ची किमयाच न्यारी

# '४० गद्दार अन् ५० खोके एकदम ओके' थाळीची चर्चा भारी!

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्रातील 'न भूतो ना भविष्यती' सत्तांतर हे प्रामाणिक व निष्ठावंत शिवसैनिकांना तर अजिबात पचनी पडताना दिसत नाही.४० गद्दार अन् ५० खोके हा विषय तर त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जातेय म्हणे. दरम्यान ५० खोकी घेऊन सत्तांतर घडवलेल्या ४० आमदारांच्या वर्तनाबद्दल शिवसैनिकांना प्रचंड चिड आहे म्हणे, गद्दारकी आणि खोकी या संदर्भाच्या पार्श्वभूमीवर,दक्षिण काशी पंढरपूर महाराष्ट्राच्या पटलावर पुन्हा चर्चेत आले आहे.**

- निष्ठावंत अन् प्रामाणिक शिवसैनिकांची गद्दारांवर म्हणे कढी!
- राज्यातील सत्ता बदल राजकारणातील 'तेज तडका' फोडणी!
- ४० आमदारांसह परिवाराला थाळीच्या भोजनाचे निमंत्रण
- दक्षिण काशीतील अजब गद्दार थाळीची गजब गोष्ट






शिवसेनेचे मुळचे पाईक मानले जाणाऱ्या निष्ठावंत शिवसैनिकांनी 'सत्तांतरा'चा चमत्कार घडविणाऱ्या ४० आमदार आणि त्यांच्या कुटुंबियांना चक्क भोजनाचे अवताण दिले आहे. याच अवताणाची आता राज्यभर खमंग आणि तेवढीच खुसखुशीत चर्चा रंगली आहे. पंढरपूर शहरानजिक सांगोला रस्त्यावर खर्डी येथील हॉटेल शिवम् फॅमिली गार्डन अ‍ॅन्ड ढाबा या ठिकाणी शिवसैनिकांनी अवताण दिले आहे. विशेषत्वे, गद्दारीकीचा संदर्भ लावून येथे स्पेशल थाळी ठेवण्यात आली आहे. '५० खोके एकदम ओके थाळी' असे या थाळीला नाव देण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे या थाळीची किंमत ही अवघी ५० रुपये ठेवण्यात आलीय, नजिकच्या काळात थाळीचा रेट वाढू शकतो. शिवसेनेचे पंढरपूर तालुका प्रमुख संजय घोडके यांच्या संकल्पनेतून हॉटेल शिवम् येथे या दोन प्रकरच्या थाळी दत्ता गायकवाड यांनी सुरू केल्या आहेत. या थाळ्यांची भन्नाट चर्चा रंगताना, मुख्य राजकारण्यांना या थाळीचा आस्वाद घेण्याचा मोह 'बार - बार' होतोय.




### असं आहे तरी काय थाळीत?

४० रुपये किमतीची '४० गद्दार' ही जी थाळी आहे, ती पूर्णपणे शाकाहारी आहे. पनीर आणि दाळ तडका या भाज्यांचा समावेश आहे. तर ५० रुपयांच्या '५० खोके एकदम ओके' या मांसाहारी थाळीत मटन, चिकन, मासे यांचा समावेश आहे.

### नाव गद्दार पण, 'ती' थाळी निष्ठावंत शिवसैनिकांसाठीच!



गद्दारकीतून ५० खोके घेत सत्तांतर घडवलेल्या शिंदे गटाच्या ४० आमदारांसह त्यांच्या परिवारासाठी '५० खोके एकदम ओके' या नावाची थाळी असली तरी ही थाळी स्वच्छ, सुंदर निर्मळ आहे. शिवाय महत्त्वाचे म्हणजे ही थाळी प्रामाणिक निष्ठावंत शिवसैनिकांसाठी आहे. ५० खोकी घेणाऱ्या ४० आमदार आणि त्यांच्या परिवाराला या थाळीच्या भोजनासाठी आमंत्रण आहे.

**- संजय घोडके (पंढरपूर तालुका शिवसेना प्रमुख)**

### मोदींची थाळी अन् पंढरपूर, सांगोल्याची थाळी...एकदम ओके !

थाळीचे जोरदार मार्केटिंग हवे, हॉटेल व्यवसाय वाढावा या हेतून सांगोला तालुक्यात 'गद्दार थाळी' या नावाने काही दिवसांपूर्वी थाळी चालू करण्यात आली. पण पंढरपूरची थाळी चालू करण्यापाठीमागे वेगळाच हेतू आहे, गद्दारांना चपराक लावण्यासाठी, निष्ठावंत शिवसैनिकांनी उपरोधातून अशी थाळी चालू केली, असे सांगण्यात आले. पण काही का असेना, कोणत्या ना कोणत्या कारणावरून महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर नेहमी चर्चेत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील थाळींची चर्चा उभ्या महाराष्ट्रात रंगली आहे. देशाचे पंतप्रधान मोदी यांनी वाजवण्यास भाग पाडलेली थाळी वेगळी होती, आणि आता पंढरपूर व सांगोल्याची थाळी वेगळी आहे. मात्र दोन्ही ठिकाणी थाळीच आहे हे मात्र नक्की!

---

### कर्मचाऱ्यांना किमान वेतन दिले नाही

## घंटागाडी मक्तेदारांना २४ तासांची नोटीस देणार : आयुक्त

**सोलापूर** : घंटागाडी कर्मचाऱ्यांना करारानुसार किमान वेतनाप्रमाणे पूर्ण वेतन अदा केले नाही. याप्रकरणी सर्व घंटागाडी मक्तेदारांना मक्ता रद्द का करू नये या संदर्भात नोटीस बजावण्याचे आदेश महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिले आहेत.

घंटागाडी वरील कर्मचाऱ्यांना नियमानुसार नियमित किमान वेतन वेळेत द्या, संरक्षक साहित्य द्या. धमकाऊ नका, नियमांची पूर्तता करा अन्यथा ब्लॅकलिस्ट किंवा फौजदारी गुन्हा दाखल करणार असा इशारा दोन महिन्यांपूर्वी महापालिका उपायुक्तांनी संबंधित मक्तेदारांना नोटीसीद्वारे दिला होता. त्यानंतर आता घंटागाडी वरील कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाचा प्रश्न पुन्हा उपस्थित झाल्याने महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी याकडे आता गांभीर्याने लक्ष दिले आहे. शहरातील कचरा संकलन करणाऱ्या घंटागाड्या, आरसी वाहने, ट्रॅक्टर, डंपर आणि जेसीबीवरील चालक आणि बिगारी अशा सुमारे ४६० कर्मचाऱ्यांचा मक्ता महापालिका प्रशासनाने झोन कार्यालयनिहाय ६ मक्तेदारांना दिला आहे. या कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळत नसल्याची तक्रार दोन महिन्यांपूर्वी घंटागाडी वरील कर्मचाऱ्यांनी आणि महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनने केली होती. घंटागाडीवरील कामगारांच्या वेतनात गफळा होत असल्याची बाब माध्यमाने वेशीवर टांगल्यानंतर अखेर मक्तेदारांनी आपल्याकडे ठेवलेले चेकबुक्स व एटीएम कार्ड हे घंटागाडी वरील काही कर्मचाऱ्यांना परत केले होते. घंटागाडी कर्मचारी हे घाणीत काम करतात, त्यांना नियमाप्रमाणे किमान वेतन मिळालंच पाहिजे अन्यथा संबंधित मक्तेदारांवर कारवाई करा.

तत्पूर्वी याप्रकरणी मक्ता रद्द का करू नये यासंदर्भात २४ तास मुदतीची नोटीस संबंधित मक्तेदारांना बजावा असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांना दिले आहेत. त्याचबरोबर या वेतन अदा प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्याची स्पष्ट आदेश महापालिका दिले आहेत.

#### केवळ दोनच मक्तेदारांकडून बँक स्टेटमेंट सादर

महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी संबंधित मक्तेदारांना घंटागाडी कर्मचाऱ्यांना दिलेल्या वेतनाच्या बँक स्टेटमेंट सादर करण्याचे आदेश दिले होते मात्र केवळ दोनच मक्तेदारांनी बँक स्टेटमेंट सादर केली आहे. उर्वरित मक्तेदारांनी दिलं नाही अशी माहिती उपायुक्त घोलप यांनी आयुक्तांना दिली.

## लग्नाचे आमिष दाखवून व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी

**सोलापूर** : लग्नाचे आमिष दाखवून व्हिडिओ व्हायरल करण्याची महिलेस धमकी दिल्याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.१० मे २०१८ ते आजतागायत पर्यंत घडली.याप्रकरणी पीडित महिलेने सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. विजयकुमार सिद्धाराम सलवाड (रा.सोनी नगर) व साक्षी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपींनी पीडीत महिलेला लग्नाचे आमिष दाखवून व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली, महिलेला साक्षी नावाच्या व्यक्तीने फोन करून शिवीगाळ करत विजय यांच्याविरुद्ध कोठे तक्रार केल्यास तुला सोडणार नाही अशी धमकी दिली. तपास पोसई गायकवाड हे करीत आहेत.




### विवाहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर** : माहेरून चार चाकी वाहन घेण्यासाठी दोन लाख रुपये घेऊन ये म्हणून विवाहितेचस शारीरिक छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी मेघा सचिन चव्हाण (वय-२५,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी सोलापूर) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पती सचिन चव्हाण,सासू लक्ष्मी चव्हाण, सासरे किरण चव्हाण,नणंद आरती चव्हाण,चुलत सासरे देवकांत चव्हाण,पतीची दुसरी पत्नी काजल काळे (सर्व.रा.सोलपुर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### जनावरांचा रास्ता रोको?



सोलापूर शहरात मोकाट जनावरांचा वावर वाढला आहे. जनावरे भररस्त्यातच ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीस अडथळा होत आहे. महापालिकेने या जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

## महापालिकेतर्फे सेवा पंधरवडा सप्ताहाचे आयोजन

**सोलापूर** : शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार दि.१७ सप्टेंबर ते २ऑक्टोबर २०२२ या कलावधी मध्ये राष्ट्रनेता ते राष्ट्रपती सेवा पंधरवडा रबविण्याचे निश्चिती केले आहे.त्या अनुषंगाने महापालिकेचे आयुक्त पि.शिवशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभगाचे अधिकारी समवेत बैठक घेण्यात आली.

या बैठकीत सोलापूर शहरतील सर्वसामान्य जनतेची कामे विहित कालावधीत व्हावीत, यासाठी सेवा पंधरवड्यामध्ये प्रामुख्याने सर्व सामान्य जनतेशी निगडीत असणाऱ्या प्रलंबित अर्ज, तक्रारी अर्ज तसेच सोलापूर महापालिकेच्या वतीने आपले सरकार वेबपोर्टलवरील सेवा, विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे, नव्याने नळ कनेक्श देणे, मालमत्ता हस्तांतरण नोंद घेणे, मालमत्ता कराची आकारणी व मागणी पत्र देणे आदी बाबींचा निपटारा लवकर करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

## स्व.विठ्ठलराव शिंदे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे सोमवारी अनावरण

### शरद पवार, जयंत पाटील, धनंजय मुंडे यांची उपस्थिती


**कुर्डूवाडी** : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते सोमवारी १९ सप्टेंबर रोजी माढा तालुका पंचायत समितीचे पहिले सभापती व माजी आमदार दिवंगत लोकनेते विठ्ठलराव शिंदे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार आहे.



यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांचीही उपस्थिती असणार आहे, अशी माहिती विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष वामन उबाळे यांनी पत्रकार परिषेदत दिली. पुतळा अनावरण पंचयात समिती कार्यालयाच्या आवारात सोमवारी सकाळी दहा वाजता होणार आहे तर शेतकरी मेळावा हा संकेत मंगल कार्यालय बायपास रोड येथे अकरा वाजता होणार आहे. दोन्ही कार्यक्रम शरद पवार यांच्या हस्ते होणार आहे. सोलापुर जिल्हा दौऱ्यावर शरद पवार अनेक दिवसांनतर येत असल्याने आगामी निवडणुकांकडे पाहता हा दौरा लक्षवेधी असणार आहे.

या पुतळा अनावरण सोहळा व शेतकरी मेळाव्याला सोलापुर जिल्ह्यातील सर्व शेतकरी व कार्यकर्ते पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे अवाहन यावेळी सभापती विक्रमसिंह शिंदे नगराध्यक्ष समीर मुलाणी, माजी सभापती बंडूनाना ढवळे, अर्जुनराव बागल, उपसभापती धनाजी जवळगे, आप्पासाहेब उबाळे,युवराज राऊत,अमोल नलवडे आदी उपस्थित होते. या शेतकरी मेळाव्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन कै. विठ्ठल राव शिंदे स्मारक प्रतिष्ठानचे सचिव ना.पा.कुलकर्णी यांनी केले.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...
अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...




शुभेच्छुक | अभिवादक
इंजि.मिलिंद म.भोसले
मो.९३७०४०२१२२
- राज्य अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ (रजि.)
महाराष्ट्र राज्य अभियंता संघटना (रजि.)
महाराष्ट्र राज्य कन्स्ट्रक्शन फोरम (SDCF)
- समन्वयक : इंजिनिअरींग कौन्सिल ऑफ इंडिया (रजि.)
- राज्य सदस्य : महाराष्ट्र राज्य सा.बा.विभाग दरसुची समिती
- संस्थापक अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य सुशिक्षित बेरोजगार स्वयंरोजगार सह.सेवा संस्था संघटना (रजि.)
Wake up Solapur Foundation (Reg.) | Email : milindmb307@rediffmail.com

अभियंता दिन
भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...
अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...




शुभेच्छुक | अभिवादक
कुर्डूवाडी नगरपरिषद कुर्डूवाडी
ता.माढा, जि.सोलापूर

अभियंता दिन
भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...
अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...




शुभेच्छुक
सागर कन्स्ट्रक्शन, बाळे
प्रो.प्रा.सागर राठोड

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...
अभियंता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...




शुभेच्छुक | अभिवादक
A.K.Shivhare Infrastructure Pvt. Ltd.
Branch Office : Railway Station Road, BIAORA Distt. Rajgarh (M.P.)
Head Office : 16, Eden Garden Chuna Bhatti Kolar Road, Bhopal (M.P.)
07374 (O) 230085, 230086 Fax : 230086 Mob.9425037549
Email : akshivhare@rediffmail.com, akshivhare2015@gmail.com



HAPPY ENGINEERS DAY
भारतरत्न
मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या
यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !
अभियंता दिन
निमित्त हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
एक अभियंता प्रेमी